रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ।वर्ष ८९। अंक १३० । पृष्ठे १० ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) 

रायगड, शुक्रवार, दि. १७ ऑक्टोबर २०२५

# कृषीवल

किंमत ४ ₹

## रायगड जिल्हाधिकारी
# नवाबावर मेहेरबान?

■ कृषी जमीन धारण करण्याच्या मर्यादेकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप

■ ॲड. सुद आणि घोणे यांनी पत्रकार परिषदेत केला प्रकार उघड

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

कायद्यानुसार, कृषी जमीन धारण करण्याची कमाल मर्यादा केवळ ५४ एकर इतकी असताना रायगडच्या जिल्हाधिकारी यांनी मुरूड जंजिऱ्यातील दिवंगत नवाब सिद्दी मोहम्मद खान यांच्या वारसांना ४ हजार ५०० एकर जमीन धारण करण्याची परवानगी दिली आहे. ही शेतजमीन पडीक अवस्थेत आहे. त्यामुळे भूमीहिनांना या जमिनी देण्याची कार्यवाही करावी, अशी मागणी मुंबई उच्च न्यायालयाच्या वकील ॲड. सोनिया सूद आणि ॲड. मंगेश घोणे यांनी केली आहे.

महाराष्ट्र कृषी जमीन सिलींग इन होल्डींग्ज कायदा १९७० लागू करण्यास जिल्हाधिकारी उदासीन ठरले असून नवाबांच्या रेकॉर्डवर अनिवार्य मृत्यूपत्र नसतानाही मूरूडच्या तहसीलदारांनी त्यांच्या मुलांच्या नावे हजारो एकर जमिनीची बेकायदेशीरपणे नोंद केल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला.

यावेळी ॲड. सुद आणि घोणे यांनी सांगितले की, रायगड जिल्ह्यात असंख्य नागरिक भूमीहीन असून ते इतरांकडे शेती करायला जातात. त्यांना स्वतःच्या हक्काची जमीन मिळावी, यासाठी अलिबागमधील जिल्हाधिकारी कार्यालयाकडे ३० हून अधिक भूमीहीनांनी अर्ज केला आहे. हा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयात धूळ खात असून त्याची दखल प्रशासनाकडून पान २ वर

### जमिनी विकण्याचा नातेवाईकांचा डाव

१९९३ ते १९९९ या कालावधीत माजी नवाबांच्या मुलांनी घोषित दहशतवादी आणि शस्त्र तस्कर इक्बाल मिर्चीची पत्नी हजरा इक्बाल मेमन यांना जमीन विकली आहे. २०१८ मध्ये पॅलेस जवळील शेतजमीन आणखी एका शस्त्र तस्कर आणि इक्बाल मिर्चीच्या जवळच्या नातेवाईकांना विकण्यात आली आहे. सध्या नवाबाचे नातेवाईक अर्शद जसदनवाला एक हजार एकर वनजमीन विकत आहे.




## सोशल मिडियावरील खोट्या प्रेमाचा शेवट मृत्यूने
# रायगड हादरला

। नागोठणे । प्रतिनिधी ।



प्रेमात आणि युद्धात सर्व काही क्षम्य असते, असे बोलले जाते. अशाचप्रकारे प्रेमात अडथळा ठरणाऱ्या आपल्या नवऱ्याचा काटा काढण्याच्या उद्देशाने आपल्या प्रियकराच्या व त्याच्या ओळखीच्या तरुणीच्या मदतीने खून करून पुरावा नष्ट करण्याचा करण्याचा गंभीर गुन्हा नागोठणे पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडला आहे.

या खून प्रकरणाने नागोठणे विभागासह संपूर्ण जिल्हा हादरला असून सोशल मीडियावर प्रेमाचा बनाव रचून, खोट्या प्रेमाच्या जाळ्यात अडकलेल्या कृष्णा नामदेव खंडवी (वय २३) रा. गौळावाडी, पो. पाबळ, ता. पेण या तरुणाचा शेवट त्याच्या मृत्यूने झाला. याप्रकरणी मृत तरुणाची पत्नी दीपाली अशोक निरगुडे (वय १९), रा. मोहाची वाडी, पो. पाबळ, ता. पेण, तिचा प्रियकर उमेश सदू महाकाळ (वय २१) रा. बारीमाळ, ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक व त्याची मैत्रीण सुप्रिया प्रकाश चौधरी (वय १९) रा. आडगाव देवळा, ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक यांच्या विरोधात नागोठणे पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आले आहे. अत्यंत क्लिष्ट स्वरूपाच्या पान २ वर

#### वेणगाव मारहाण प्रकरण
## तरुणाचा मृत्यू

। नेरळ । प्रतिनिधी ।

वेणगाव येथील जमिनीच्या वादातून भावकीतील लोकांनी एका तरुणाला बेदम मारहाण केली. या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या मृत्यूप्रकरणी कर्जत पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल असून आरोपी असलेले तिघेही फरार आहेत.

धाकटे वेणगाव गावात ही घटना घडली. जमिनीच्या वादातून ९ ऑक्टोबर रोजी पहाटेच्या सुमारास काही लोक सतीश शिंदे या तरुणाच्या घरात घुसले आणि त्यांच्यावर पान २ वर



## पान १ वरून

# रायगड जिल्हाधिकारी नवाबावर मेहेरबान?

घेण्यात आली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

मात्र गेल्या अनेक वर्षापासून दिवंगत नवाबाच्या नावावर मुरूड तालुक्यात साडेचार हजार एकर जमीन आहे. नवाबाच्या मुलांनी स्पष्ट मालकी हक्काशिवाय शेकडो एकर जमीन विकली आहे, याबाबत कारवाई करण्यास जिल्हाधिकारी उदासीन ठरले आहेत. २०१५ मध्ये संसदेत जाहीर केलेल्या परदेशात बँक खाती लपवणाऱ्या १०० भारतीयांच्या यादीत अर्शद यांचे ३७ क्रमांकावर आहे. त्याने परदेशात बँक खाती लपविली आहेत, असा आरोप करीत जिल्हाधिकारी यांनी माजी नवाबाच्या जमिनींची विक्री थांबवावी. ही जमीन शासन जमा करून गरजूंना शेती जमीन देण्यात यावी, अशी मागणी पत्रकार परिषदेतून त्यांनी केली आहे.

## तरुणाचा मृत्यू

जोरदार हल्ला केला. या हल्ल्यात सतिश गंभीर जखमी झाला होता. त्यानंतर संबंधित तरुण तेथून पळून गेले होते. जखमी तरुण सतीश शिंदे यांच्यावर रुग्णालयात दाखल करून उपचार करण्यात येत होते. मात्र उपचार सुरू असतानाच सतिशचा मृत्यू झाला. त्यामुळे गावावर शोककळा पसरली असून वेणगाव गावातील या प्रकरणची गंभीर दखल जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी घेतली. घरात घुसून मारहाण केल्याचा गुन्हा कर्जत पोलीस ठाण्यात दाखल होता. या गुन्ह्यात किरण नितीन शिंदे, मंगेश बाळू जाधव (दोघे रा. धाकटे वेणगाव) आणि जय सुनिल साबळे (रा. करंजाडे, पनवेल) हे आरोपी होते. आता जखमी तरुण सतीश शिंदे यांच्या मृत्यूमुळे हा गुन्हा आणखी कडक बनला असून तीनही आरोपींविरोधात खुनाचा गुन्हा दाखल केला जाणार आहे. सतीश शिंदे यांना जखमी करून फरार झालेले तिघे अद्याप फरार असून पोलीस त्या सर्वांचा शोध घेत आहेत.

## रायगड हादरला

या गुन्ह्यात आरोपींनी पोलिसांची दिशाभूल करून, तपासाला वेळोवेळी वेगळे वळण देण्याचा प्रयत्न केल्याने आणि कोणताही धागा दोरा नसतानाही तांत्रिक व वैज्ञानिक तपासाच्या आधारे वेगवान तपास चक्रे फिरवून केवळ ७२ तासांच्या आत नागोठणे पोलिसांनी हा गुन्हा उघडकीस आणला. जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे, रोहाचे पोलीस उपअधीक्षक प्रसाद गोकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी, पोलीस उपनिरीक्षक सुरज पाटील, उपनिरीक्षक नरेश थळकर, पोलीस हवालदार महेश लांगी, प्रशांत भोईर, चंद्रशेखर नागावकर, महिला पोलीस हवालदार मनिषा लांगी, दिपा पाटील, प्रकाश हंबीर यांच्या पथकाने केलेल्या अथक प्रयत्नातून हा गुन्हा उघडकीस आल्याने नागोठणे पोलिसांच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

एखाद्या चित्रपटाच्या कथानकाला शोभेल अशा प्रकारच्या आणि तपासकामी नाट्यमय घडामोडी घडलेल्या या थरारक गुन्ह्याची थोडक्यात हकीकत अशी की, नागोठणे पोलीस ठाण्यात १३ ऑक्टोबर, २०२५ रोजी मनुष्य मिसिंग तक्रार दाखल असलेला तरुण कृष्णा खंडवी याची पत्नी दीपाली निरगुडे हिचे उमेश महाकाळ याच्याशी सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रेम जुळल्याने त्यांचे गेल्या दोन वर्षांपासून प्रेम संबंध होते. त्यांना लग्नही करायचे होते. माणगाव येथे राहून नर्सिंगचे शिक्षण घेत असलेल्या दीपाली हिचे शिक्षण येत्या काही महिन्यात पूर्ण होणार असल्याने शिक्षण पूर्ण होताच आपल्याला सासरी नवऱ्याकडे जावे लागेल याची कल्पना दीपालीला होती. त्यानंतर आपल्या प्रेमात अडथळा ठरणाऱ्या आपल्या नवऱ्याचा त्यापूर्वीच काटा काढण्याचे दीपाली व उमेश यांनी ठरविले. त्यासाठी त्यांनी कुणी कल्पनाही करू शकत नाही अशाप्रकारचे कटकारस्थान तयार केले.

उमेश याने आपली जवळची मैत्रीण सुप्रिया चौधरी हिला विश्वासात घेऊन तिलाही या कटकारस्थानात सहभागी केले. ठरल्याप्रमाणे सुप्रिया हिने इंस्टाग्रामवर पायल वारगुडे नावाचे बोगस अकाउंट तयार केले. त्यानंतर तिने कृष्णा खंडवी याच्याबरोबर व्हाईस कॉल करून प्रेमाचे खोटे संबंध जुळविले. आपल्यावर संशय येऊ नये म्हणून सुप्रिया हिने वेगवेगळ्या व्यक्तींच्या क्यूआर कोड स्कॅनरवर कृष्णा याच्याकडून दोन हजार रुपये, ८० रुपये व ६० रुपये असे स्वीकारले. सुप्रियाच्या प्रेमाच्या जाळ्यात संपूर्णतः अडकलेल्या कृष्णा याला आपण कधी एकदा सुप्रियाला भेटतोय अशी इच्छा निर्माण झाली. त्यानंतर या दोघांनी दिनांक १० ऑक्टोबर, २०२५ रोजी नागोठण्यात भेटायचे ठरविले. त्याच दिवशी उमेश व सुप्रिया हे सोबत मोटार सायकलवर नागोठणे येथे आले व स्वतःची ओळख पटू नये म्हणून उमेश याने तोंडाला रुमाल व सुप्रिया हिने स्कार्फ बांधून घेतले. त्यानंतर सुप्रिया हिने कृष्णा याला नागोठणे एसटी स्टँडवर बोलविले. तेथे कृष्णा याने आणलेल्या दोन कॅडबरी चॉकलेट सुप्रियाला देऊन तेथे एकमेकांनी आपल्या प्रेमाची कबुली दिली. त्यानंतर प्रेमात वेडा झालेल्या कृष्णा हा उमेश व सुप्रिया यांच्यामध्ये मोटार सायकलवर बसला. उमेशने मोटारसायकल नागोठण्याच्या पूर्वेकडील बाजूस वासगाव रस्त्यालगत असलेल्या घनदाट जंगलात नेली. त्या ठिकाणी कृष्णा व सुप्रिया हे एकमेकांशी चालत चालत प्रेमाच्या गोष्टी करण्यात दंग झालेले असतानाच उमेश याने त्यांच्या पाठीमागून येऊन कृष्णा याचा ओढणीने गळा आवळून त्याला खाली पाडून त्याच्या पाठीवर व डोक्यावर आपटून मरेपर्यंत गळा आवळून कृष्णा याचा खून केला. कृष्णा निपचिप पडल्यानंतर तो मेल्याची खात्री करण्याकरिता पुन्हा उमेश याने कृष्णाच्या बुटाची लेस काढून ती मानेभोवती आवळून मानेला बांधून ठेवली व कृष्णा मृत झाल्याची खात्री झाल्याने त्यांच्या कटकारस्थानात ठरल्याप्रमाणे मृतदेहाची ओळख पटू नये यासाठी मृत कृष्णा याचा चेहरा, हात व छाती वरती कोणतेतरी घातक केमिकल टाकून पुरावा नष्ट केला. तसेच मृत कृष्णा याचे खिशातून त्याचा मोबाईल काढून, त्यातील सिम कार्ड काढून तो मोबाईल पाली येथे फोडून फेकून दिला. या गुन्ह्यात कोणताही धागा दोरा नसतानाही नागोठणे पोलिसांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनानुसार या गुन्ह्याचा छडा लावण्यात यश मिळवले आहे.

नागोठण्यातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात असलेल्या सीसीटीव्ही प्रणालीच्या फुटेजचे या गुन्ह्यातील तपास कामी मोलाचे सहकार्य झाले. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस अधिक्षक आंचल दलाल, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे व रोह्याचे पोलीस उप अधिक्षक प्रसाद गोकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी हे स्वतः करीत आहेत.

दरम्यान कोणीही संशयित व्यक्तीवर विश्वास ठेवू नये. तोंड बांधलेले, रुमाल बांधलेल्या व्यक्तींबरोबर तसेच सोशल मिडियाच्या माध्यमातून ओळख झालेल्या व्यक्तीवर विश्वास न ठेवता स्वतःची खातरजमा करावी. खातरजमा न झाल्यास अथवा संशयास्पद आढळल्यास जवळच्या पोलीस ठाण्यात जाऊन त्याबाबतची माहिती द्यावी. ही बाब पोलिसांच्या लक्षात आणून द्यावी, असे आवाहन रायगड पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

### पनवेल महानगरपालिका

**ई- निविदा नोटीस**

मा.आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व अनुभवी व्यक्ती, संस्था, ठेकेदार, किंवा कंपनी यांचेकडून ई-निविदा पद्धतीने निविदा मागवित आहेत. खालील कामाचे कोरी निविदा फॉर्म :https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि.१७/१०/२०२५ ते दि. ३०/१०/२०२५ पर्यंत सायंकाळी १५.०० पर्यंत उपलब्ध राहणार आहेत. सदरच्या जाहीर ई निविदा ऑनलाईन कार्यप्रणालीद्वारे स्वीकारण्यात येतील.

| अ.क्र. | कामाबाबत तपशील | कामाची मुदत | बयाणा रक्कम | कोरी ई-निविदा फॉर्मची किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | पनवेल महानगरपालिका करीता कॉम्प्रेस जॅकेटेड कॅल्शियम हायपोक्लोराइट टॅब्लेट खरेदी करणेबाबत | ०३ महिने | रु.२३,९१९/- | रु.१,०५०/- (जी.एस.टी.सह) |

**ई-निवीदा प्रसिद्धेचा तपशिल**

| Stage | Date | Time |
|---|---|---|
| Publish Date | १७/१०/२०२५ | At १२:०० |
| Document Download Start Date | १७/१०/२०२५ | At १५:०० |
| Document Download End Date | ३०/१०/२०२५ | At १५:०० |
| Bid Submission Start Date | १७/१०/२०२५ | At १५:०० |
| Bid Submission End Date | ३०/१०/२०२५ | At १५:०० |
| Bid Opening Date | ३१/१०/२०२५ | At १५:०० |

सही /-
अतिरिक्त आयुक्त
पनवेल महानगरपालिका

### SAU VANDANA TASGAONKAR COLLEGE OF NURSING

(Affilated to Maharashtra University of Health Sciences, Nashik)
Dr. N.Y.Tasgaonkar Educational Complex, Village Chandhai,
Bhivpuri Road Station, Tal-Karjat, Dist-Raigad, 410201.
Email: principal.vtcn@tasgaonkartech.com. Web: www.vtnursing.in

**ADMISSION FOR VACANT SEATS FOR ACADEMIC YEAR 2025-2026**

Applications are invited from eligible candidates Who are desirous of taking admission under INSTITUTIONAL LEVAL /NRI/against NRI For BSC.nursing course Year 2025-2026.

Refer http://www.mahacet.org for eligibility criteria and for the status of vacant seats. The eligible and interested candidates should contact office in person.

**Principal**

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

### पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड- ४१०२०६

दूरध्वनी कार्यालय ०२२-२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. ०२२-२७४५२२३३
आयुक्त कार्यालय : ०२२-२७४५२३३९ उपायुक्त कार्यालय : ०२२-२७४५५७५१
ई-मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट : www.panvelcorporation.com

जा.क्र./पमहा./पर्या./३९२५/प्र.क्र.१५/२९६/२०२५ दि. १६/१०/२०२५

**माझी वसुंधरा अभियान ६.० अंतर्गत**
**फटाकेबंदी व ध्वनीप्रदूषणाबाबत जाहीर आवाहन**
**फटाकेबंदी**

भारत सरकार अधिसूचना क्रमांक GS.R. ६८२ (E), Date. ५.१०.१९९९ बैठक अन्वये १२५ dB (१) पेक्षा जास्त आवाज निर्माण करणाऱ्या फटाक्यांची निर्मिती, विक्री किंवा वापर करण्यास मनाई केली आहे. अशा फटाक्यांचे उत्पादन, विक्री किंवा वापर बेकायदेशीर आहे. तसेच आपणा सर्वांना माहितच आहे की, आपण वातावरणीय बदलास सामोरे जात आहोत. वातावरणीय बदलाच्या अनेक कारणांपैकी हवेचे प्रदूषण हे एक महत्वाचे कारण आहे. विविध सण/उत्सव प्रसंगी आपण वाजवत असलेल्या फटाक्यांमध्ये कार्बन व सल्फरचे प्रमाण अधिक असते. जे विषारी वायूंची निर्मिती करतात. हे विषारी वायू वनस्पती, पक्षी, प्राणी तसेच मानवी प्रजातीस हानी पोहोचवतात. हवेचे प्रदूषण थांबवण्याची कृती आपण स्वतः पासून सुरू करू शकतो.

सबब माझी वसुंधरा अभियानांतर्गत येणाऱ्या दिवाळी सण/उत्सवात भारत सरकार अधिसूचना क्रमांक GS.R. ६८२ (E), Date. ५.१०.१९९९ बैठक अन्वये १२५ dB (१) पेक्षा जास्त आवाज निर्माण करणाऱ्या फटाक्यांची निर्मिती, विक्री किंवा वापर करण्यास/वाजविण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. तरी सर्व नागरिकांनी/फटाके विक्रेते यांनी याची अंमलबजावणी करावी. असे आवाहन पनवेल महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे. तसेच यावर्षीची ही दिवाळी हरित व पर्यावरणपुरक दिवाळी म्हणून साजरी करूयात.

ही दिवाळी आपल्या आणि आपल्या कुटुंबियांसाठी आनंदी व सुरक्षित राहो, दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

**ध्वनी प्रदूषण**

पनवेल शहरातील सर्व फटाके विक्रेते आणि नागरिकांना सूचित करण्यात येते की, ध्वनी प्रदूषण म्हणजे त्रासदायक ध्वनी ज्याचा मानव आणि प्राण्यांच्या आरोग्यावर व शरीरावर दुष्परिणाम होतो तसेच नैसर्गिक घटना आणि मानवी कृतीमुळे निर्माण होणाऱ्या उच्च तीव्रता ध्वनीमुळे ध्वनीप्रदूषण होते. पनवेल शहरातील सर्व नागरिकांना सूचित करण्यात येते की, रहिवासी परिसरात साजरे केले जाणाऱ्या घरगुती व सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये उत्सवांमध्ये रात्री १०.०० वाजलेनंतर रहिवासी क्षेत्रामध्ये ४५ dB इतकी ध्वनी मर्यादा ठेवणेसाठी क्षमतेपेक्षा जादा आवाजाचे लाऊडस्पीकर, फटाके ध्वनी प्रदूषण करणारे घटक वाजवण्यात येऊ नयेत. तसे आढळून झाल्यास ध्वनी प्रदूषण (नियमन आणि नियंत्रण) नियम २००० अंतर्गत कायदेशीर कारवाई करणेत येईल.

**आवाजाच्या संदर्भात परिसरातील हवेची गुणवत्तेची मानके**

| क्षेत्र | ध्वनीची मर्यादा | |
|---|---|---|
| | दिवसाची वेळ (सकाळी ६.०० ते रात्री १०.००) | रात्रीची वेळ (रात्री १०.०० ते सकाळी ६.००) |
| औद्योगिक क्षेत्र | ७५ dB | ७० dB |
| व्यवसाय क्षेत्र | ६५ dB | ५५ dB |
| रहिवासी क्षेत्र | ५५ dB | ४५ dB |
| शांतता क्षेत्र | ५० dB | ४० dB |

सही/-
**उपायुक्त (पर्यावरण)**
**पनवेल महानगरपालिका**

### पनवेल महानगरपालिका

ता.पनवेल, जिल्हा-रायगड, पनवेल ४१० २०६

दुरध्वनी कार्यालय :०२२-२७४५८०४०/४१/४२
ई-मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट : www.panvelcorporation.com.

जा.क्र.- पमपा/मातंवि/३०२५/प्र.क्र.११/३८१/२०२५ दिनांक : १६/१०/२०२५

**जाहीर निविदा सूचना**

| अनु. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १. | जा.क्र.-पमपा/मातंवि/३०२५/प्र.क्र.११/३८१/२०२५ | पनवेल महानगरपालिकेमध्ये वैद्यकीय आरोग्य विभागा करींता UPHC Management System संगणक प्रणाली तयार करणेबाबत. (१+४ वर्षाकरीता) |

या जाहीर सुचनेबाबतची विस्तृत माहिती हि माहिती व तंत्रज्ञान विभाग येते दि. १७/१०/२०२५ ते दि. ३०/१०/२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत उपलब्ध होईल. याची संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
**उप आयुक्त (मातंवि)**
**पनवेल महानगरपालिका**

### पनवेल महानगरपालिका

**परवाना विभाग**
**जाहीर आवाहन**

यावर्षी दि. १८/१०/२०२५ पासून दिवाळी सण सुरू होत असून, दिवाळी सणामध्ये फटाक्यांची मोठ्या प्रमाणात खरेदी विक्री होत असते. त्यामुळे विक्रेते या व्यवसायाला पसंती देतात. नागरिक मोठ्या प्रमाणामध्ये फटाके खरेदी करीत असतात. मात्र फटाक्यांच्या विक्रीसाठी परवाना आवश्यक आहे. याकामी पनवेल महानगरपालिका हद्दीमध्ये प्रभाग स्तरावर फटाके विक्रीकरीता दुकानदार/नागरिक हे महानगरपालिकेकडे तात्पुरते फटाका विक्री करणेकरीता परवानगी मिळणेकामी संबंधित प्रभाग समितीतंर्गत अर्ज करणे आवश्यक आहे.

शासन निर्णय क्रमांक : याचिका २०१६/प्र.क्र. ४३२/नवि-२० दि. ०५ नोव्हेंबर २०१६ व जनहित याचिका क्र. १५२/२०१५ च्या दि. १७ व २५ ऑक्टोबर २०१६ च्या आदेशानुसार फटाका विक्रीची दुकाने खुल्या जागेमध्ये/पटांगणामध्ये विक्रीसाठी असणे आवश्यक आहे. त्यामुळे एखादी घटना घडल्यास कमीत कमी नुकसान होईल तसेच फटाक्यांचा साठा आणि विक्री यांचे नियमन व संनियंत्रण करणे शक्य होईल.

शहराच्या गर्दीच्या व गजबजलेल्या मार्गावर, दाट वस्तीच्या भागात फटाके परवाने मंजूर केले जाणार नाही. त्यामुळे या भागातील परवान्यासाठी अर्ज करू नयेत. महापालिकेच्या अग्निशमन विभागाकडून मार्गदर्शक सूचना जारी करणेत आलेल्या आहेत. या सूचनांनुसार फटाका विक्रेत्यांनी सुरक्षेबाबत खबरदारी घेणे आवश्यक आहे.

**विक्री परवान्यासाठी आवश्यक कागदपत्रे**

१. विहीत नमुन्यातील अर्ज, जागेचे ना हरकत प्रमाणपत्र
२. आजूबाजूच्या रहिवाश्यांचे ना हरकत
३. जागेच्या मालकी हक्काबाबतचे कागदपत्र
४. स्थळदर्शक नकाशा, महापालिका अग्निशमन अधिकाऱ्यांचे ना हरकत

**विक्रेत्यांनी घ्यावयाची काळजी**

१. फटाक्यांची दुकाने समोरासमोर नसावेत.
२. फटाका विक्रीच्या ठिकाणी तेलाचा दिवा, खुला विद्युत दिवा वापरू नये.
३. दुकानाच्या ५० मीटर परिसरामध्ये आतषबाजी करू नये.
४. दुकानात लाकडी रॅंक, कापडी शामीयानाचा वापर करू नये.
५. दुकानात ज्वलनशील पदार्थ ठेवू नये.
६. १८ वर्षांखालील मुलांना फटाके विक्री करू नये.
७. अग्निशमन यंत्रे, बादल्या पुरेशा प्रमाणात ठेवाव्यात.

उक्त प्रमाणे फटाका खरेदी-विक्रीकामी नागरिक व विक्रेत्यांनी आवश्यक बाबींचा अवलंब करावा.

सही/-
**(रविकिरण घोडके)**
उपायुक्त
परवाना विभाग
पनवेल महानगरपालिका

पमपा/परवाना/१२९५/२०२५
दिनांक :- १६/१०/२०२५

### सिडको
शहरांचे शिल्पकार

## नोटीस-१

साडेबावीस टक्के योजनेअंतर्गत वाटप भूखंडाचे हस्तांतरण "ना हरकत पत्र" मागणी अर्जानुसार नोटीस सर्व श्री. सागर सचिन अग्रवाल व श्री. आकाश सचिन अग्रवाल, सर्व राहणार - रा. बी-१७०४, क्षितीज बिल्डींग, भूखंड क्र. ३, सेक्टर १९, सानपाडा, नवी मुंबई ४०० ७०५ (अर्जदार).

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदारांनी खाली उल्लेखीत २२.५% योजनेअंतर्गत त्यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे मे. पुरूषोत्तम बिल्डर्स अॅण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार १) कैलास गोकर करोत्रा २) नारायण राघवजी रावरिया ३) अनिल भानजी रावरिया ४) हिरजी राघवजी रावरीया ५) रघु अंबवी पटेल ६) अब्दुल गनी अब्दुल रेहमान दादन ७) प्रदीप भुराभाई पटेल ८) विजय महादेव पटेल ९) वसंत देवजी पटेल १०) रमेश कानजी गजोरा ११) लालजी जिवा चौधरी १२) प्रियांक मेघजी पटेल १३) हरीश मोहनप्रकाश चौधरी १४) रतीलाल देवजी पटेल यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता "ना हरकत प्रमाणपत्रासाठी" मागणी अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ट भूखंडाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करारनामा तथा भाडेपट्टा करारनामा नोंदणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | | |
| २८२५ | ०९.१०.२०२५ | पुष्पक नोड | २७ | ०१ | ६५७०.०० चौ. मी. | ३०.०६.२०२३ | १८.०७.२०२३ २०.०७.२०२३ |

या नोटीसद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहीत **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** यांचे कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसांच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर "ना हरकत प्रमाणपत्र" देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**(स्वाक्षरी)**
मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/३०२/२०२५-२६

### मूरूड जंजिरा नगरपरिषद, मुरूड

**माझी वसुंधरा अभियान ६.० अंतर्गत फटाके बंदी व ध्वनी प्रदुषणबाबत जाहीर आवाहन**

ULB कोड : ८०२८०२

**फटाके बंदी**

भारत सरकार अधिसुचना क्रमांक G.S.R. 682 (E), Date. 5.10.1999 बैठक अन्वये १२५ dB (१) पेक्षा जास्त आवाज निर्माण करणाऱ्या फटाक्यांची निर्मिती, विक्री किंवा वापर करण्यास मनाई केली आहे. अशा फटाक्यांचे उत्पादन, विक्री किंवा वापर बेकायदेशीर आहे. तसेच आपणा सर्वांना माहितीच आहे कि आपण वातावरणीय बदलास सामोरे जात आहोत. वातावरणीय बदलाच्या अनेक कारणांपैकी हवेचे प्रदुषण हे एक महत्वाचे कारण आहे. विविध सण/उत्सव प्रसंगी आपण वाजवत असलेल्या फटाक्यांमध्ये कार्बन व सल्फरचे प्रमाण अधिक असते. जे विषारी वायूंची निर्मिती करतात हे वायू वनस्पती, पक्षी, प्राणी तसेच मानवी प्रजातीस हानी पोहोचवतात. हवेचे प्रदुषण थांबवण्याची क्रिया आपण स्वत:पासून सुरू करू शकतो. सबब माझी वसुंधरा अभियानांतर्गत येणाऱ्या सण/उत्सवात फटाके वाजविण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. तरी सर्व नागरीकांनी याची अंमलबजावणी करावी, असे आवाहन करण्यात येत आहे. तसेच ही दिवाळी हरित व पर्यावरणपुरक दिवाळी म्हणून साजरी करूयात. दिवाळी आनंदी व सुरक्षित राहो अशा सर्वांना हार्दिक शुभेच्छा !

**ध्वनी प्रदुषण**

मुरूड शहरातील सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते की, ध्वनी प्रदुषण म्हणजे त्रासदायक ध्वनी ज्याचा मानव आणि प्राण्यांच्या आरोग्यावर व शरीरावर दुष्परिणाम होतो. नैसर्गिक घटना आणि मानवी कृतीमुळे ध्वनी प्रदुषण होते. याचे मुख्यकारण म्हणजे औद्योगिक सुविधा, लाऊडस्पीकर, हॉर्न, फटाके सतत उच्च आवाजात करणारे ध्वनीयंत्र वापरलेस ध्वनी प्रदुषण होते. मुरूड शहरातील सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते की, रहिवासी परिसरात साजरे केले जाणाऱ्या घरगुती व सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये उत्सवांमध्ये रात्री १०.०० वाजलेनंतर रहिवासी क्षेत्रामध्ये ४५dB इतकी ध्वनी मर्यादा ठेवणेसाठी क्षमतेपेक्षा जादा आवाजाचे लाऊडस्पीकर, फटाके ध्वनी प्रदुषण करणारे घटक वाजवण्यात येऊ नयेत. तसे आढळून आल्यास ध्वनी प्रदूषण (नियमन आणि नियंत्रण) नियम २००० अंतर्गत कायदेशीर कारवाई करणेत येईल.

**आवाजाच्या संदर्भात परिसरातील हवेची गुणवत्तेची मानके**

**ध्वनीची मर्यादा**

| क्षेत्र | दिवसाची वेळ (सकाळी ६.०० ते रात्री १०.००) | रात्रीची वेळ(रात्री १०.०० ते सकाळी ६.००) |
|---|---|---|
| औद्योगिक क्षेत्र | ७५ dB | ७० dB |
| व्यवसाय क्षेत्र | ६५ dB | ५५ dB |
| रहिवासी क्षेत्र | ५५ dB | ४५ dB |
| शांतता क्षेत्र | ५० dB | ४० dB |

सही/-
**मुख्याधिकारी**
**मुरूड जंजिरा नगरपरिषद**

## जाहिर सूचना (शुद्धीपत्रक)

**रायगड जिल्ह्यातील ताडी दुकानांचा ई-लिलाव सन २०२५-२६**

तमाम जनतेस कळविण्यांत येते की, रायगड जिल्ह्यातील ८७ ताडी दुकानांचा जाहिर लिलाव (ई-लिलाव-नि-निविदा) पद्धतीने दि.३१.१०.२०२५ रोजी www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर घेण्यात येणार होता. परंतू काही तांत्रिक अडचणीमुळे सदरचा जाहिर लिलाव (ई-लिलाव-नि-निविदा) प्रक्रिया रद्द करुन नव्याने दि.०७.११.२०२५ रोजी आयोजित करण्यात येत आहे. लिलाव संबंधितांना कळविण्यांत येते की, सदर ई लिलावाच्या अटी व शर्ती तसेच प्रक्रियेबाबत अधिक माहिती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर तसेच अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, रायगड-अलिबाग व सर्व विभागीय निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, रायगड-अलिबाग यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल. सदरील ई लिलावात भाग घेवू इच्छिणाऱ्या सर्व संबंधितांनी याबाबत नोंद घेण्यात यावी. दिनांक १६.१०.२०२५

सही/-
**जिल्हाधिकारी, रायगड**

# निवडक

## बेकायदेशीर प्लांटला प्रशासनाची ढाल

**उरण** : तालुक्यातील नागाव-म्हातवली परिसरात बेकायदेशीर प्लांटने अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. पर्यावरण कायद्याला आणि जनतेच्या आरोग्याला तिलांजली देत सुरु असलेला हा प्लांट, जिल्हाधिकारी आणि स्थानिक ग्रामपंचायतीच्या छत्रछायेखाली फोफावत आहे. ग्रामपंचायत नागावने १९९८ साली तब्बल ५ लाख रुपये खर्च करून गावासाठी पिण्याच्या पाण्याची विहीर उभारली होती. मात्र, प्लांटमधून बाहेर टाकण्यात येणाऱ्या केमिकलयुक्त पाण्याने व कॉंक्रिट कचऱ्याने ही विहीर आज संपूर्णपणे दूषित झाली असून, गावकऱ्यांचा हक्काचा पाणीपुरवठा पूर्णतः बंद पडला आहे. धक्कादायक बाब म्हणजे या बेकायदेशीर प्लांटच्या मागे ग्रामपंचायतीतील विद्यमान सदस्यांचा थेट सहभाग असल्याचे बोलले जाते. त्यामुळेच ग्रामपंचायत उघडपणे या धंद्याची पाठराखण करत असल्याची चर्चा जनतेत आहे. त्याहून गंभीर म्हणजे, पर्यावरण विभाग, प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि 'इयर' विभाग यांची भूमिका ही सगळ्यात संशयास्पद आहे. धूळ, आवाज, केमिकलयुक्त पाण्याचा खुलेआम कहर होत असताना हे सर्व विभाग कानावर हात ठेवून गप्प आहेत. नागरिकांचे आरोग्य धोक्यात असतानाही त्यांचे दुर्लक्ष हा सरळसरळ जनतेच्या जीवाशी खेळ ठरत असल्याचे स्थनिक नागरिकांकडून बोलले जात आहे.




## भेसळयुक्त मिठाई विक्रेत्यांवर कारवाईची मागणी

**अलिबाग** : दीपावलीच्या पार्श्वभूमीवर मिठाई आणि गोड पदार्थांची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढते. या मागणीचा गैरफायदा घेत खवा, मावा यांमध्ये भेसळ केली जाते, ज्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण होतो. याच पार्श्वभूमीवर सुराज्य अभियानच्यावतीने रायगड येथील जिल्हाधिकारी यांना सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी यांच्यावतीने तहसीलदार शितल रसाळ यांनी निवेदन स्वीकारले. या निवेदनाची प्रत पेण येथील सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांनाही देण्यात आली. सुराज्य अभियान दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शासनाने नागरिकांना निरभेसळ आहार देण्याची हमी दिलेली आहे. त्यामुळे प्रशासनाने सणासुदीच्या काळात मिठाई व खवा उत्पादन केंद्रांवर अचानक तपासणी मोहीम राबवावी आणि खवा व गोड पदार्थांचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवून अहवाल सार्वजनिक करावा. त्यात भेसळ आढळल्यास संबंधितांचे परवाने रद्द करून त्यांच्यावर कडक कारवाई करावी. यासोबतच नागरिकांमध्ये जनजागृतीसाठी पत्रके व प्रसारमाध्यमांचा उपयोग करावा, अशा मागण्या करण्यात आल्या. हे निवेदन देताना सुराज्य अभियानचे जिल्हा समन्वयक अधिवक्ता उमेश आठवले, नितीन गावंड, सचिन शिपाई, सनी शिपाई आणि दिक्षा म्हात्रे आदी उपस्थित होते.

## सराईत चोरट्याकडून गुन्हा उघडकीस

**पनवेल** : पनवेल शहरासह करंजाडे व परिसरात चैन स्नॅचिंगसह मोटार सायकली चोरील जाण्याच्या घटना सातत्याने घडत होत्या. त्याबाबत पनवेल पालिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले होते. पनवेल शहर पोलिसांनी तांत्रिक मदतिच्या सहाय्याने सराईत गुन्हेगारास घेतले आहे. तसेच, त्याच्याकडून आतापर्यंत चोरीच्या २ मोटार सायकलींसह चैन स्नॅचिंगचे ४ गुन्हे उघडकीस आणले आहेत. गेल्या काही दिवसांपासून चैन स्नॅचिंग व मोटार सायकलींच्या चोरी संदभार्त काही गुन्हे पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आले होते. या संदर्भात वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदशनाखाली गुन्हे शाखेचे पोनि शाकीर पटेल, पोलीस उपनिरीक्षक विनोद लबडे, हजरत पठाण, पोलीस हवालदार अविनाश गंथडे, परेश म्हात्रे, योगेश दिवेकर, महेंद्र वायकर, पोलीस नाईक सम्राट डाकी, मिथुन भोसले, प्रवीण मेथे, शशिकांत काकडे, पोलीस शिपाई चंद्रशेखर चौधरी, नितीन कांबळे, महिला पोलीस शिपाई साधना पवार आदींच्या पथकाने गुप्त बातमीदार आणि तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपी सलमान साजिद जाफरी उर्फ शेरू (२२) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे अधिक चौकशीकेली असता त्याने चोरलेल्या २ मोटार सायकली आणि सोन्याच्या दागिन्यांची चोरी उघडकीस आली. त्यातील दोन मोटारसायकलींची किंमत जवळपास १ लाख १५ हजार इतकी तर, सोन्याच्या दागिन्यांची किंमत जवळपास ९५ हजार इतकी असा एकूण २ लाख १० हजार रुपये किमतीचा ऐवज हस्तगत करण्यात आला. अधिक तपास पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

# सुधागडातील लेण्यांची दुरवस्था



## उपद्रवी लोकांकडून विद्रुपीकरण

### पर्यटकांना आवाहन

ठाणाले लेण्यांसह तालुक्यातील इतर लेण्या अतिशय प्राचिन असुन ऐतिहासिक दृष्ट्या खुप महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे पुरातत्व खात्याने वेळीच या लेण्यांची डागडुजी व देखभाल करणे गरजेचे आहे. येथे येणाऱ्या पर्यटकांनी लेण्यांवर नावे टाकुन येथील सौंदर्याला गालबोट न लावता, येथील परिसर साफ व संरक्षित कसा राहील, याची दक्षता घेतली पाहीजे, असे आवाहन परिवर्तनवादी पत्रकार संघ महाराष्ट्रने केले आहे.

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

**सुधागड तालुक्यात प्राचीन व बहुमूल्य लेण्यांचे समूह आढळतात. तसेच, या लेण्या देशविदेशातील अभ्यासक व पर्यटकांचे आकर्षण ठरत आहेत. मात्र, जगभरातील पर्यटकांना भावणाऱ्या या लेण्या जतन करण्याची गरज निर्माण झाली आहे. या प्राचिन लेण्यांकडे प्रशासन व पुरातत्व विभागाचे फारसे लक्ष नसल्याने त्यांची प्रचंड दुरवस्था झाली आहे. या वास्तू नामशेष होण्याची भिती असल्यामुळे त्यांचे जतन व संगोपन करण्याची गरज निर्माण झाली आहे.**

### ठाणाळे लेणीचे सौंदर्य लुप्त

ठाणाळे लेणी समुहात चैत्यगृह, स्मारक, स्तुपसमुह, सभागृह व उर्वरित २१ विहार लेणी आहे. बहुतांश विहारांमध्ये व्हरांडे आणि एक किंवा दोन खोल्या असून त्यामध्ये शयनासाठी ओटे आहेत. काही विहारांमध्ये समोरच्या भागात दालन व चार पाच भिक्षुंच्या निवासाची व्यवस्था आहे. अशा विहारात आंतरदालन, प्रवेशद्वार, खिडकी व शयन ओटे आहेत. ५ पायऱ्या असलेल्या एका विहारात वाकाटककालिन रंगीत चित्रांचे काही अवशेष दिसतात. प्राकृत ब्राम्ही लिपीतील शिलालेख असलेले एक पाण्याचे टाके आहे. पाण्याचे हौद, टाके, ब्राम्ही शिलालेख भित्तीचित्र आहेत. या सर्वांची मोठ्या प्रमाणात पडझड झाली आहे. बरेच अवशेष भग्नावस्थेत आहेत. अनेक उपद्रवी लोकांनी येथील स्तुप, चैत्यगृह, स्मारक यावर चुन्याने व ऑईल पेन्टने आपली नावे कोरली आहेत. त्यामुळे या ऐतिहासिक वास्तुचे सौंदर्य लुप्त झाले आहे.



निसर्गाच्या कुशीत वसलेल्या सुधागड तालुक्यातील या प्राचीन बौद्ध कालीन लेण्या देशविदेशातील अभ्यासक व पर्यटकांचे आकर्षण ठरत आहेत. येथे ठाणाळे, नेणवली, गोमाशी व चांभार अशा भव्य लेणींचा समूह आहे. मागील वर्षी या लेण्यांमध्ये अमेरिकेतील भन्ते वेन सुका ध्यानधारणेसाठी आल्या होत्या. तर, अनेक देशविदेशातील अभ्यासक दौरे देखील करत असतात. येथील स्तुप, विहार, चैत्यगृह, शिलालेख स्मारक यांची मोठ्या प्रमाणात पडझड झाली असुन त्यावर अनेक उपद्रवी लोकांकडून रंग रंगोटी व विद्रुपीकरण करण्यात येत असल्याने लेणी प्रेमी व पर्यटकांतून नाराजी व्यक्त करण्यात येते. इतिहासाची भरभक्कम साक्ष देणाऱ्या या वास्तु नामषेश होण्याची भिती निर्माण झाली आहे. त्यामुळे त्यांचे जतन व संगोपन होण्याची अतिशय आवश्यकता आहे, असे बोलले जात आहे. तसेच, ठाणाळे लेण्यांसारखा ऐतिहासिक व पुरातन ठेवा जतन करण्यासाठी प्रशासनाकडून विशेष व प्रभावी उपाययोजना राबविण्यात यावी, अशी मागणी पर्यटकप्रेमी व लेणीप्रेमी यांनी केली आहे.

## पान पट्टीवरून थेट कोट्याधीश

| उरण | प्रतिनिधी |

भाड्याच्या खोलीत पानटपरी चालवणारा सोनू काही वर्षांत थेट कोट्याधीश कसा झाला, हा प्रश्न आज उरणकरांच्या चर्चेत अग्रस्थानी आहे. साधा पानटपरी चालक, जो कालपर्यंत सुगंधी चुना लावून ग्राहकांना पान देत होता, तोच आज द्रोणागिरी नोडमधील लाखोंच्या सदनिकेत वास्तव्याला गेला आहे. एवढेच नाही तर गाळा व सदनिका विकत घेऊन नव्या व्यवसायाचे साम्राज्य उभारण्याच्या तयारीत आहे. एवढा पैसा नेमका कुठून आला? हा चमत्कार नसून नशेच्या काळ्या धंद्यातून मिळालेली गोड कमाई असल्याचा ठाम संशय स्थानिक नागरिकांनी व्यक्त केला आहे. स्थानिक नागरिकांचा आरोप आहे की, सोनूचा हा उदय साध्या पानव्यवसायातून झालेला नाही. पान व गुटखा विकणे हा बहाणा असून प्रत्यक्षात चरस, गांजा आणि इतर नशेच्या पदार्थांची विक्रीच त्याच्या संपत्तीमागचे खरे कारण आहे. पानटपरीच्या आडून उघडपणे चालणाऱ्या या गोरखधंद्याला सरकारी यंत्रणांचा मूक आशीर्वाद मिळाल्याशिवाय सोनूचे साम्राज्य एवढ्या झपाट्याने वाढणे शक्यच नाही. स्थानिक पोलीस, अन्न-औषध प्रशासन, तसेच इतर संबंधित संस्था या प्रकरणाकडे जाणीवपूर्वक डोळेझाक करत आहेत का, असा गंभीर प्रश्न उरणकरांमधून उपस्थित केला जात आहे.

## प्रवासादरम्यान दागिन्यांची चोरी

| पनवेल | प्रतिनिधी |

एसटी प्रवासादरम्यान एका महिलेकडे असलेल्या हॅन्डबॅग मधून सोन्याच्या दागिन्यांची डबी लंपास केल्याची घटना पनवेल एसटी स्टॅन्ड परिसरात घडली आहे. पोयनाड येथील सविता पाटील (६६) या पनवेल एसटी स्टॅन्ड येथून शिवशाही बसमध्ये बसल्या असताना त्यांना त्यांच्याकडे असलेल्या हॅन्डबॅगची चैन उघडी दिसली. त्यावेळी त्यांनी तपासणी केली असता त्यांच्याकडे असलेल्या सोन्याचे मंगळसूत्र, ४ बांगड्या व हार असा मिळून ११ लाख २० हजार रुपये किमतीचा ऐवज चोरीला गेल्याचे त्यांच्या लक्षात आले. याबातची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# परतीच्या पावसाने भातशेतीचे नुकसान

| चणेरा | प्रतिनिधी |



काही दिवसांवर दिवाळी येऊन ठेपली असतानाच परतीच्या पावसाने शेतकऱ्यांच्या आशा-आकांक्षांवर अक्षरशः पाणी फेरले आहे. रोहा तालुक्यात बुधवारी (दि.१५) सायंकाळी सातच्या सुमारास वादळी वाऱ्यासह झालेल्या मुसळधार पावसाने भातशेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान केले आहे. विशेषतः धाटाव, खांब, विरजोली, सुतारवाडी, देवकान्हे, चणेरा, तांबडी, मेढा, धामणसई आणि यशवंत खार या परिसरांमध्ये नुकसानाचे प्रमाण गंभीर असल्याचे स्थानिक शेतकऱ्यांनी सांगितले. त्यामुळे हाता-तोंडाशी आलेले भातपिक पावसाने हिरावून घेतल्याने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर हतबलतेचे सावट पसरले आहे. काही दिवसांपूर्वीच शेतकऱ्यांनी हवामानाचा अंदाज पाहून कापणीला सुरुवात केली होती; मात्र, अचानक आलेल्या या मुसळधार पावसामुळे उभ्या तसेच कापणी केलेल्या भातपिकाचे मोठे नुकसान झाले आहे. आधीच मागील पावसामुळे नुकसान सहन केलेल्या शेतकऱ्यांचे उरलेसुरले पिकही आता पाण्यात बुडाले आहे.

दरम्यान, तालुका कृषी अधिकारी महादेव करे यांनी शेतकऱ्यांना सावध राहण्याचे आवाहन केले आहे. परतीचा पाऊस अजून पूर्णपणे ओसरलेला नाही. अजून काही दिवस काही भागांत पावसाची शक्यता असून, ज्यांनी भातपिकाची कापणी केली आहे त्यांनी ते पिक तात्काळ झोडून घ्यावे. त्यामुळे पुढील नुकसान कमी होऊ शकते, असे त्यांनी सांगितले.

# बस स्थानकातील सुरक्षारक्षकाला मारहाण

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

कार पार्कींगच्या वादावरून अलिबाग बस स्थानकातील सुरक्षारक्षकाला एका मद्यपीने मारहाण केल्याची घटना गुरुवारी (दि.१५) घडली. त्या मद्यपीविरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, अलिबाग एसटी स्थानकाच्या आवारात खासगी सुरक्षारक्षक गुरूवारी दुपारी दोन वाजताच्या सुमारास कर्तव्य बजावत असताना चारचाकी कार घेऊन एक व्यक्ती स्थानकामध्ये आला. त्याने स्थानकाच्या आवारात वाहन पार्कींग करण्याचा प्रयत्न असता सुरक्षारक्षकाने त्याला अडवून वाहन पार्कींग करण्यास परवानगी नसल्याचे सांगितले. त्यावेळी दारूच्या नशेत असलेली एक व्यक्ती अचानक त्याठिकाणी आला. त्याने सुरक्षारक्षकाला शिवीगाळी करण्यासह धक्काबुक्की केली. या घटनेची माहिती स्थानकातील कर्मचाऱ्यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी मद्यपीला रोखण्याचा प्रयत्न केला. मात्र, तो त्यांनाही शिवीगाळी व धमकी देऊ लागला. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात मद्यपी विरोधात तक्रार करण्यात आली आहे. तसेच, अलिबाग स्थानकात मद्यपीसह काही अवैध व्यवसायिकांचा सुळसुळाट वाढला आहे. त्यामुळे प्रवासी सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाल्याची चर्चा सुरु आहे.

## दुबार नोंदणीच्या चौकशीची मागणी

- **परप्रांतीय नागरिकांच्या एकापेक्षा जास्त मतदान नोंदी**
- **ठाकरे गटाकडून तक्रार**

| उरण | प्रतिनिधी |

उरण विधानसभा मतदार संघात परप्रांतीय नागरिकांची नावे त्यांच्या मुळ गावासह उरणमध्ये देखील एकाचवेळी नोंद झाल्याचे आढळले आहे. त्यामुळे त्याचा विपरीत परिणाम मतदान प्रक्रियेत होत आहे. राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी ही दुबार नाव नोंदणी काढून, सर्व नावे एकाच ठिकाणी ठेवण्याची मागणी केली आहे.

उरणचा औद्योगिक विकास झपाट्याने होत असल्यामुळे लोकसंख्या सतत वाढत आहे. परप्रांतीय नागरिक मोठ्या प्रमाणात येत असल्याने ते आपली नावे दोन्ही मतदार संघात ठेवत आहेत, ज्यामुळे दोन्ही ठिकाणी मतदान करणे सोयीचे होते. काही मतदारांना चक्क मयत दाखवून मतदानापासून वंचित ठेवले जात असल्याचे तक्रारीत नमूद आहे. मयत म्हणून नोंद केलेल्या मतदारांनी ओळखपत्रे दाखवूनही मतदान करण्यास परवानगी मिळालेली नाही, अशी तक्रार शिवसेना (ठाकरे गट) पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी तहसीलदारांकडे केली आहे. राजकीय पक्षाच्या मागणीनुसार, निवडणूक आयोगाने सर्व मतदारांची ओळख पुन्हा तपासून, त्यांची नावे दुसऱ्या ठिकाणी नसल्याची खातरजमा करूनच मतदार याद्या अंतिम कराव्यात, अशी जोरदार मागणी करण्यात येत आहे.

## खांदेश्वरमध्ये चिमुरडीचा विनयभंग

**पनवेल** : खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक धक्कादायक घटना घडली आहे. येथील एका इमारतीत काम करणाऱ्या ६९ वर्षीय सुरक्षारक्षकाने त्याच इमारतीत राहणाऱ्या ८ वर्षीय मुलीसोबत अश्लील व लैंगिक चाळे केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. भारत बुचुन गौड असे या सुरक्षारक्षकाचे नाव असून त्याने पीडित मुलीसोबत अनेकवेळा अश्लील व लैंगिक चाळे केल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणाची माहिती पीडित मुलीच्या घरच्यांना समजल्यानंतर त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी याप्रकरणी भारत गौडविरोधात गुन्हा नोंद करून अटक केली आहे.

# प्रिया पाटील ठरली 'फोटो सुंदरी'




| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

रायगड फोटोग्राफर्स अँड व्हिडीओ ग्राफर्स असो.च्यावतीने 'रायगड फोटो सुंदरी' फॅशन शो स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत प्रिया पाटील हिने हा किताब मिळविला. त्यामुळे अलिबागच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला.

फोटो एक्स्पोमध्ये छायाचित्रकारांना मॉडेल व फॅशन फोटोग्राफी संदर्भात ज्ञान अवगत व्हावे व अनुभव मिळावा या उद्देशाने ही स्पर्धा घेण्यात आली. जिल्ह्यातील प्राथमिक फेरीत सहभागी झालेल्या २६ स्पर्धकांपैकी १४ स्पर्धकांची अंतिम फेरीसाठी निवड केली. त्यातील वेस्टर्न वेशभूषा परिधान करून रॅम्पवॉक करणाऱ्या अलिबाग येथील प्रिया पाटील हिने 'रायगड फोटो सुंदरी'चा किताब पटकावला. तर, सिद्धी वाकडे हिने द्वितीय व पुजा बांधकर हिने तृतीय क्रमांक पटकवला. विजयी स्पर्धकांना पेणच्या माजी नगराध्यक्षा प्रितम पाटील यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी फोटोग्राफर असो.चे संस्थापक अध्यक्ष विवेक सुभेकर, विद्यमान अध्यक्ष समीर भायदे, उपाध्यक्ष समीर मालोदे, आनंद निंबरे, जितेंद्र मेहता, दीपक बडगुजर, दादा आर्ते, अनिरुद्ध जोशी, अविनाश राऊत, सुशिल घाटवळ, निलेश शिर्के, चैतन्य पाटील, संदीप म्हात्रे, सर्व तालुका फोटोग्राफर्स असो.चे अध्यक्ष, पदाधिकारी आणि सदस्य उपस्थित होते.

## पुनर्रचित हवामानावर आधारित विमा योजना | लाभ घेण्याचे कृषी अधिकाऱ्यांचे आवाहन

# बागायतदारांना मिळणार विम्याचे संरक्षण

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |




शासनाच्या निर्णयानुसार २०२४-२५ व २०२५-२६ या वर्षांसाठी पुनर्निर्दिष्ट हवामानावर आधारित फळपीक विमा योजना राबविण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत आंबा व काजू उत्पादक शेतकऱ्यांना हवामानातील प्रतिकूल परिस्थितीमुळे होणाऱ्या उत्पादनातील नुकसानीपासून संरक्षण मिळणार आहे. पुनर्रचित हवामानावर आधारित फळपीक विमा योजना अंमलात केली जाणार आहे. त्यातून आंबा व काजू उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.

या योजनेसाठी एम. अफ्रीड इन्शुरन्स कंपनी लिमिटेड या कंपनीची नियुक्ती करण्यात आली असून, शेतकऱ्यांनी आपल्या फळपीकासाठी नोंदणी करून निश्चित मुदतीत विमा हप्ता भरावा. या योजनेत नैसर्गिक घटकांमुळे होणाऱ्या नुकसानीसाठी संरक्षण मिळणार आहे. काजू फळपीकासाठी १ डिसेंबर ते २८ फेब्रुवारी या कालावधीत अवकाळी पाऊस, कमी तापमान आणि गारपीट यांसाठी विमा लागू राहील. या विम्याचा हप्ता दर प्रती हेक्टरी ६ हजार रुपये निश्चित करण्यात आला असून विमा संरक्षण १ लाख २० हजार रुपये इतके आहे. आंबा फळपीकासाठी १ डिसेंबर ते ३१ मार्च तसेच १५ मेपर्यंत अवकाळी पाऊस, तापमानातील बदल, वाऱ्याचा वेग आणि गारपीट या नैसर्गिक संकटांपासून विमा संरक्षण मिळणार आहे. या विम्याचा हप्ता दर प्रती हेक्टरी १४ हजार ४५० रुपये असून १ लाख ७० हजार रुपये विमा संरक्षण आहे.

त्यासाठी शेतकऱ्यांनी आपला ७/१२ उतारा, आधार कार्ड, बँक पासबुक, फळपीकाचे छायाचित्र, तसेच अर्ज सादर करावा. नोंदणी आणि हप्ता भरण्याची अंतिम मुदत ३० नोव्हेंबरपर्यंत आहे. नोंदणीसाठी शेतकरी जवळच्या बँक, सीएससी केंद्र किंवा कृषी विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर शेतकऱ्यांनी नोंदणी करावी. नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या संभाव्य नुकसानीपासून संरक्षण मिळवण्यासाठी सर्व पात्र शेतकऱ्यांनी दिलेल्या मुदतीत फळपीक विमा हप्ता भरून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कृषी अधिकारी वंदना शिंदे यांनी केले आहे.

### आजच लाभ घ्या

**शेतकऱ्यांनी आजच आपला ७/१२ सह इतर आवश्यक कागदपत्रांची प्रत अर्जासह जवळील बँक, सीएससी केंद्र किंवा कृषी विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर सादर करावीत. अंतिम मुदत ३० नोव्हेंबरपर्यंत असून शेतकऱ्यांनी दिलेल्या मुदतीत फळपीक विमा हप्ता भरून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कृषी अधिकारी वंदना शिंदे यांनी केले आहे.**

# उरणमध्ये महिला कार्यकर्त्यांमध्ये रस्सीखेच

| उरण | प्रतिनिधी |

निवडणूक कोणतीही असो उमेदवार कोण असणार? त्याबाबत कायमच कमालीची उत्सुकता असते. तीन ते चार वर्षांची दीर्घ प्रतीक्षा, राजकीय उत्सुकतेचा धगधगता प्रश्न आणि नगरपरिषदेवर चाललेले प्रशासकीय राज्य या सर्वांवर पडदा पडला आणि नगराध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर झाले. आरक्षण जाहीर होताच गुडघ्याला बाशिंग बांधून तयार असलेल्या संभाव्य उमेदवारांचे स्वप्न भंगले. अनेक पुरुषांनी देव पाण्यात घातले होते पण अनेकांचा पत्ता कट होऊन आता नगरपालिकेत महिलांचे वर्चस्व प्रस्थापित होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

उरणमध्ये नगराध्यक्षपद महिलांसाठी आरक्षित झाल्यामुळे वर्षानुवर्षे पक्षासाठी झटणाऱ्या महिला कार्यकर्त्यांना आणि महिला पदाधिकाऱ्यांना संधी मिळणार, ही आशा पल्लवीत झाली. मात्र, अनेक राजकीय पुढारी आता त्यांच्या सौभाग्यवती, मुलगी किंवा कुटुंबातील इतर महिलांचा चेहरा पुढे करीत असल्यामुळे पक्षातील महिला कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे. पक्षाच्या कार्यासाठी महिला कार्यकर्त्या लागतात; मात्र, उमेदवार म्हणून घरच्या गृहमंत्र्यांचा विचार होत असेल तर पक्ष कार्यासाठीही त्यांना घराबाहेर का काढत नाहीत, अशाही चर्चा आता रंगू लागल्या आहेत.

# आयोगाचा दगडी प्रतिसाद

निवडणुकीतील मतदारयाद्यांमधील भानगडींबाबत तक्रार करण्यासाठी राज्यातील विरोधकांनी मंगळवार व बुधवार असे सलग दोन दिवस निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांची भेट घेतली. पण त्यांना काहीही स्पष्ट उत्तर मिळाले नाही. वास्तविक मतदारयादीतील दोष किंवा भानगडी ही आयोगाची जबाबदारी आहे. त्यांच्याबाबत आयोगाने स्वतःहून पुढे येऊन तात्काळ कारवाई करायला हवी. पण इथे विरोधकांना दगडावर डोके आपटल्याचा अनुभव आला. लोकशाहीच्या दृष्टीने हे चांगले लक्षण नाही. या संदर्भात शरद पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षातर्फे महिनाभरापूर्वी आयोगाला एक पत्र देण्यात आले होते. त्याची पोचपावती त्या पक्षाचे माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी भर बैठकीत दाखवली. पण राज्याचे निवडणूक अधिकारी चोक्कलिंगम यांनी असे कोणतेही पत्र मिळाले नसल्याचे सांगितले. पहिल्या दिवशी हा अनुभव आल्याने दुसऱ्या दिवशी विरोधी नेते पुन्हा तयारीने गेले. त्यांनी चोक्कलिंगम व राज्याचे निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांची भेट घेतली. पण त्यांनी निव्वळ टोलवाटोलवी करून वेळ काढला. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरच होणार हे या वर्षीच्या प्रारंभापासून सर्वांना ठाऊक आहे. मात्र तरीही आयोगाने याबाबत पुरेशी दक्षता घेतलेली नाही. मतदारयाद्यांमध्ये कमालीचे घोळ असून एकेका माणसाचे अनेक ठिकाणी मतदार म्हणून नाव असणे, पत्ते बनावट असणे किंवा पत्तेच नसणे, एका पत्त्यावर शंभर ते चारशे लोक राहत असल्याचे दाखवलेले असणे असे अनेक प्रकार समोर आले आहेत. पण याबाबत राज्य व केंद्राचे अधिकारी एकमेकांकडे बोट दाखवत आहेत. पालिका, जिल्हा परिषदा इत्यादी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी १९९४ पासून राज्य निवडणूक आयोग अस्तित्वात आहे. मात्र मतदारयादी तयार करणे ही जबाबदारी केंद्रीय निवडणूक आयोगाचीच आहे. आतादेखील गेल्या वर्षी विधानसभेला वापरलेली मतदारयादी अधिक तिच्यात गेल्या वर्षभरात केले गेलेले बदल यांच्या आधारे अंतिम यादी बनवली जाणार आहे. ही अर्थातच केंद्रीय निवडणूक आयोगाचे काम आहे. पण निवडणुका घेण्याचे काम या सदरात तो ही जबाबदारी राज्याच्या आयोगावर ढकलत आहे. पण यात मधल्या मध्ये प्रामाणिक मतदार, राजकीय पक्ष व लोकशाही प्रक्रिया यांचा बळी जाणार आहे.

## भाजपशी साटेलोट्याचा संशय

यादीतील दोष एकाहून एक भयंकर आहेत. शिवाय ते कोणी मुद्दाम घडवून आणते आहे का याचा संशय घ्यायला भरपूर जागा आहे. नालासोपाऱ्याच्या सुषमा गुप्ता यांचे उदाहरण आता सर्वत्र प्रसिध्द झाले आहे. त्यांचे नाव चार वेगवेगळ्या ठिकाणी असल्याचे बारा ऑगस्टला प्रसिध्द झाले. वृत्तवाहिन्यांनी याच्या बातम्या करताच संध्याकाळ ते नाव गायब झाले. याचा तपास करताना आयोगाच्या बाहेरच्या कंत्राटी व्यक्ती यादीत नावे घालण्याचे व काढून टाकण्याचे काम करतात की काय अशी शंका निर्माण झाली. वास्तविक यादीतून नाव हटवताना संबंधित मतदाराला त्याची बाजू मांडण्याची संधी दिली जाते असे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांनी मोठ्या तोऱ्यात काही दिवसांपूर्वी सांगितले होते. ते खोटे असल्याचे देशातील इतर प्रकरणांमध्ये दिसले होतेच. नालासोपाऱ्याच्या घटनेने त्यावर शिक्कामोर्तब झाले. पण राज्यातील निवडणूक अधिकारी याबाबत काहीही धड बोलू शकत नाहीत. वाईट गोष्ट अशी की याद्यांमध्ये इतक्या प्रकारचे भ्रष्टाचार असल्याचे दिसत असूनही याच याद्यांच्या आधारे निवडणुका घेण्यावर आयोग ठाम आहे. नोटा बनावट आहेत असे उघड झाल्यानंतरही एखाद्या सरकारने त्याच नोटांच्या आधारे अधिकृत व्यवहार चालू ठेवावेत तशा गुन्हेगारी स्वरुपाचा हा प्रकार आहे. या याद्यांमध्ये सुधारणा करा आणि मगच निवडणुका घ्या ही विरोधकांची मागणी अत्यंत रास्त व लोकशाहीला धरून आहे. पण चार महिन्यात निवडणुका घ्या या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा हवाला देऊन आयोग आपले म्हणणे पुढे रेटू पाहत आहे. उद्या याद्यांमध्ये भानगडी ठाऊक असूनही मतदान झाले असे म्हणून कोणी ना कोणी न्यायालयात जाणार आहेच. त्यावेळी ही निवडणूक रद्द होईल अशीच शक्यता अधिक आहे. ही नामुष्की आणि खर्च टाळण्यासाठी तरी किमान आयोगाने विरोधकांचे म्हणणे मान्य करायला हवे. पण मोदी सत्तेत आल्यापासून विरोधकांच्या मतांवर बुलडोझर फिरवून आपल्याला हवे तेच करत जायचे याला शौर्य मानण्याची पध्दत रूढ झाली आहे. निवडणूक आयोगासारख्या घटनात्मक संस्थेने त्याच मार्गाने जावे हे संतापजनक आहे. आयोग व भाजप यांचे साटेलोटे असल्याचा संशय यावा असे अनेक प्रकार गेल्या चार वर्षात झाले आहेत. आता राज्याचा निवडणूक आयोगही तेच करतो आहे.

## दारुण आणि करुण

पालिका निवडणुकांमध्ये व्हीव्हीपॅटची सोय नसेल. म्हणजेच आपण ज्याला दिले त्यालाच आपले मत गेले आहे का हे पाहण्याची सोय उपलब्ध नसणार. हाही संशयास्पद प्रकार आहे. मुळात इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीनबाबतच विरोधकांनी अनेकदा आक्षेप घेतले आहेत. ते दूर करण्यासाठी व्हीव्हीपॅटची सोय करण्यात आली. तीच इथे काढून घेतली जाणार आहे. त्यामुळे विरोधकांनी सरसकट जुन्या रीतीने मतपत्रिका टाकून मतदान घेण्याची मागणी केली आहे. राहुल गांधी यांनी सात ऑगस्टला घेतलेल्या पहिल्या पत्रकार परिषदेत निवडणूक आयोगाचे वाभाडे काढले. एकेका मतदाराची चार नावे, बनावट पत्ते, फोटो इत्यादी गोष्टी त्यांनी पुराव्यानिशी मांडल्या. पण त्यांना आयोगाने नव्हे तर भाजपच्या प्रवक्त्यांनी आणि देवेंद्र फडणवीस यांच्यासारख्यांनी उत्तरे दिली. आतादेखील मतदारयादीतील दोष दूर करा अशी मागणी विरोधकांनी आयोगाकडे केली आहे. पण तिला उत्तर मात्र फडणवीसांनी दिले आहे. आगामी पराभवाला घाबरूनच विरोधक असे करत आहेत असे त्यांनी म्हटले आहे. पण याद्या सुधारणेच्या मागणीला भाजपवाले इतका जीव खाऊन का विरोध करीत आहेत याचे उत्तर जनतेला मिळायला हवे. अशा भानगडयुक्त याद्या असल्यामुळेच भाजपला गेल्या विधानसभेला इतके विक्रमी यश मिळाले होते असे विरोधकांचे म्हणणे आहे. हा आरोप खोटा ठरवण्याची भाजपला चांगली संधी आहे. त्या पक्षानेही आयोगाकडे याद्या दुरुस्त करण्याची आग्रही मागणी करायला हवी. प्रत्यक्षात भाजप, शिंदे आणि अजित पवार गट हे एकच भाषा बोलत आहेत आणि आयोगही त्यांची री ओढत आहे. राज्यातील अनेक पालिका, जिल्हा परिषदा इत्यादींच्या निवडणुका तीन ते पाच वर्षांमध्ये झालेल्या नाहीत. ओबीसी आरक्षणाबाबतचा खटला सर्वोच्च न्यायालयात लटकल्याने निवडणुका रखडल्या. आतादेखील न्यायालयाचा अंतिम निकाल येईल तेव्हा पुन्हा नव्याने आरक्षण देऊन नव्याने निवडणुका घ्याव्या लागण्याची शक्यता आहेच. या स्थितीत या निवडणुका आणखी तीन-चार महिने पुढे गेल्याने फारसे बिघडणार नाही. त्याऐवजी आधी मतदारयादीतील गोंधळ निपटण्याला सर्वोच्च प्राधान्य देणे योग्य ठरेल. तसे झाले तरच मतदारांचा निवडणुकांवरचा विश्वास कायम राहील. अन्यथा, हा सगळाच भ्रष्टाचार आहे असे म्हणून तो मतदान करणेही थांबवेल. निवडणूक आयोगाला हे सर्व पटवून देण्यासाठी इतका आटापिटा करावा लागावा व विरोधकांनी दोन दिवस खर्ची घालूनही ठोस काही पदरात पडू नये ही दारुण व करुण अवस्था आहे.

विचार

# आसामच्या आवाजाचा अनुत्तरीत मृत्यू

**अश्विनी पारकर**

*झुबीन गर्गचा आवाज आसाममधून वाहणाऱ्या नदीसारखा होता. तो चहाच्या दुकानात, बसमधील गर्दीमध्ये, लग्नांमध्ये असा सर्वत्र ऐकू यायचा. आसामच्या भूमीतील हा गायक गेली तीन दशके फक्त गात नव्हता, तर समाज आणि राजकारणाबद्दल उघडपणे, तीव्रपणे बोलायचा. काहींनी त्याचे कौतुक केले, तर काहींनी टीका केली. पण कोणीही दुर्लक्ष केले नाही. म्हणूनच त्याच्या अचानक मृत्यूने लोकांना वीज पडल्यासारखा धक्का बसला.*




१९ सप्टेंबरच्या सकाळी गायक झुबीन गर्ग याचे सिंगापूरमध्ये निधन झाल्याची बातमी आली तेव्हा आसाममध्ये पहिली प्रतिक्रिया होती ती अविश्वासाची. ज्या गायकाचा आवाज त्यांच्या प्रेमकथांचा, प्रेमभंगाचा, उत्सवाचा, इतकंच नव्हे तर त्यांच्या दैनंदिन जीवनाचा होता; तो शांत झाला हे स्वीकारण्यास आसाममधील लोक तयारच नव्हते. आसाममध्ये पोहोचलेली पहिली बातमी साधी होती. जुबीन गर्ग लाझारस बेटाजवळ स्कूबा डायव्हिंगला गेला होता, तो जखमी झाला होता, त्याला रुग्णालयात नेण्यात आले होते आणि तिथेच तो मरण पावला. हा धक्का बसताच चाहत्यांनी त्याच्या घरी आणि सार्वजनिक ठिकाणी, मंदीरांमध्ये, दुकानांवर गर्दी केली. सोशल मीडियावर, हजारो पोस्टमध्ये त्याचा चेहरा, त्याचा आवाज आणि त्याच्या गाण्यांच्या ओळी होत्या. त्या सुरुवातीच्या काही तासांमध्ये लोकांना हा एक अपघात आहे, असे वाटले. पण लवकरच कथा बदलू लागली. झुबीनच्या मृत्यूनंतर वेगवेगळे अहवाल समोर आले आणि लवकरच सत्य अस्पष्ट वाटू लागले. हा खरोखरच स्कूबा अपघात होता की यात आणखी काही रहस्य होते? त्याच्या शवविच्छेदनाबद्दल लपवल्या गेलेल्या तपशीलांमुळे अनेक प्रश्न उपस्थित होऊ लागले. त्याच्या मृत्यूचे गूढ अनेक शंका निर्माण करु लागले. त्यानंतर झुबीनच्या एका बँडमेटने माध्यमांशी बोलताना झुबीनला विषबाधा झाल्याची शक्यता वर्तवली. अचानक दुःखद अपघात म्हणून सुरू झालेली कहाणी संभाव्य गुन्हा बनली. त्याच्या स्वतःच्या मॅनेजरला अटक करण्यात आली. यॉटवर त्याच्यासोबत असलेल्या इतर लोकांनाही ताब्यात घेण्यात आले. दररोज नवीन माहिती बाहेर येत होती, परंतु त्यात पुरेशी स्पष्टता नसल्याने अधिक गोंधळ निर्माण झाला. त्याच्यावर सर्वाधिक प्रेम करणाऱ्यांना प्रश्न पडला की त्या शेवटच्या तासांमध्ये खरोखर काय घडले हे कधी कळेल का?

जनतेचे दुःख रागात बदलले. सुरुवातीला लोक त्याची गाणी गाण्यासाठी, मेणबत्त्या पेटवण्यासाठी, त्याला श्रद्धांजली वाहण्यासाठी जमले. पण लवकरच आसाममधील वातावरण अधिक तीव्र झाले. गर्दी रस्त्यावर उतरली. तपासात एका टेलिव्हिजन चॅनलच्या मालकाचे नाव समोर आल्यानंतर शेकडो लोकांनी त्याच्या कार्यालयाबाहेर निदर्शने केली. झुबीनचे कौतुक करणारे पोस्टर्स आणि घोषणा आता न्याय मागण्यासाठी वापरल्या जाऊ लागल्या. लोकांमध्ये अविश्वासाची लहर होती. तरुण पिढी या निदर्शनांच्या आघाडीवर होती. आसाममधील 'जेन झी'साठी झुबीन गर्ग हे त्यांच्या पालकांच्या काळातील केवळ एक गायक नव्हते तर ते त्यांच्या स्वतःच्या जीवनाचा एक भाग होते. ते युट्युबवर, फोनवर, स्ट्रीमिंग ॲप्सवर त्याचे संगीत ऐकत मोठे झाले होते. त्यांच्यासाठी तो आवडता पॉपस्टार होता. म्हणून तो मरण पावला तेव्हा ते घरी शांत बसले नाहीत. त्यांनी निदर्शने केली, आवाज उठवला. सोशल मीडियावर त्याचे व्हिडिओ, गाणी स्वतःच्या जळजळीत पोस्टसह व्हायरल केले. त्यांनी हॅशटॅग ट्रेंड बनवला आणि लाईव्ह अपडेट्स शेअर केले. त्यांचे दुःख एक चळवळ बनली आणि त्यांच्या शोकाचे रुपांतर सत्याच्या मागणीत बदलले. सोशल मीडियावर जेन झीने वादळ उठवले आहेच, पण इतरही चाहत्यांनी झुबीनवर श्रद्धांजलींचा वर्षाव केला. आपल्या गाण्यांनी झुबीनने कठीण काळात कसे वाचवले याबद्दल चाहत्यांनी लिहिले.

१८ नोव्हेंबर १९७२ रोजी गुवाहाटी येथे जन्मलेला झुबीन संगीताच्या वातावरणातच वाढला. त्याचे वडील तबलावादक होते आणि आई गायिका होती. इतर मुलांनी अक्षरे शिकली, तशीच या लहान मुलाने राग, ताल आणि सूर सहज आत्मसात केले. तो किशोरावस्थेतच गाणी लिहू लागला होता आणि आसामी संगीत मोठ्या प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याचे स्वप्न पाहत होता. १९९० च्या दशकात त्याने आसामी संगीतक्षेत्रात पाऊल ठेवले. 'माया' आणि 'पाखी'सारख्या गाण्यांनी त्याला आसाममध्ये रातोरात स्टार बनवले. त्याच्या संगीत मैफिली तरुण चाहत्यांनी भरलेल्या असत. त्यामध्ये त्यांना स्वतःच्या आकांक्षा प्रतिबिंबित करणारा आवाज ऐकायला मिळायचा. झुबीनने तब्बल ४० भाषांमध्ये गाणी गायली, ज्यामध्ये आसामीपासून बंगाली, नेपाळी, बिहू, भोजपूरी, तामिळ, उडिया, सिंधी, तेलगू या भाषांचा समावेश होता. आसामी, बंगाली, हिंदू, मुस्लिम, आदिवासी प्रत्येकाने त्याची गाणी गुणगुणली. तथापि, त्याचे नशीब आसामच्या सीमेत अडकू शकले नाही. २००६ मध्ये झुबीनने 'गँगस्टर' या बॉलीवूड चित्रपटासाठी 'या अली' गायले. हे गाणे त्याच्या आयुष्यातील एक टर्निंग पॉईंट ठरले. मुंबईच्या रस्त्यांपासून कैरोच्या कॅफेपर्यंत, दिल्लीतील रेडिओ स्टेशनपासून दुबईतील नाईट क्लबपर्यंत 'या अली' सर्वत्र गाजत होते. गुवाहाटीचा हा मुलगा अचानक राष्ट्रीय दर्जाचा स्टार बनला. अनेक आसामी श्रोत्यांसाठी हे केवळ त्याचे यश नव्हते तर त्यांचा सामूहिक विजय होता. त्यांच्या स्वतःच्या भाषेला आणि संस्कृतीला जागतिक राजदूत मिळाला होता.

त्यानंतर झुबीनने अनेक बॉलीवूडपटांसाठी गाणे गायले, तरीही त्याने मातीशी नाते तोडले नाही. आसामी संगीताला तर त्याने समर्पित करुन घेतले होते. त्याने आसामी चित्रपटांना संगीत देणे, त्याच्या मातृभाषेत एकल अल्बम रिलीज करणे आणि तरुण संगीतकारांना प्रोत्साहन देणे सुरूच ठेवले. त्याने 'मिशन चायना' तसेच अनेक आसामी चित्रपटांमध्ये अभिनय केला आणि दिग्दर्शनही केले. त्यातील अनेक चित्रपट ब्लॉकबस्टर ठरले. तो अनेकदा म्हणायचा की, बॉलिवूडने त्याला प्रसिद्धी दिली, तर आसामी संगीताने ओळख दिली. झुबीनचे जीवन अनेक विरोधाभासांनी भरलेले होते. तो स्पष्टवक्ता होता, कधी कधी वादग्रस्त होता, अनेकदा तडजोड करण्यास तयार नव्हता. तो राजकारणावर टीका करत असे, सामाजिक समस्यांबद्दल बोलत असे परंपरेला, रुढींना आव्हान देत असे. यामुळे तो काहींसाठी बंडखोर बनला. तो आसाममधील जनतेसाठी एक असा नायक होता, जो निर्भयपणे सत्य बोलायचा. पूरग्रस्तांसाठी संगीत कार्यक्रम आयोजित करायचा, रुग्णालयांसाठी पैसे उभारायचा आणि विद्यार्थ्यांच्या निदर्शनांमध्ये सहभागी व्हायचा. त्याला केवळ मनोरंजन करणारा गायक बनायचे नव्हते, तर सामाजिक जाणीव असलेला एक जबाबदार नागरिक बनायचे होते.

झुबीनचा सिंगापूरमध्ये अचानक झालेला मृत्यू हे केवळ संगीतक्षेत्रातील नुकसान म्हणता येणार नाही, तर विवेकाचा आवाज शांत झाल्याची बोच देणारी हताशा आहे. अधिकृत अहवालात म्हटले आहे की तो लाजरस बेटाजवळ पोहताना बुडाला. तो आसामचे संगीत जागतिक स्तरावर नेण्याच्या उद्देशाने ईशान्य भारत महोत्सवासाठी सिंगापूरला गेला होता. साक्षीदारांनी सांगितले की त्याला पाण्यात श्वास घेण्यास त्रास होत होता. त्याला त्या क्षणी वाचवण्यात आले. सीपीआर देण्यात आला. परंतु तो वाचू शकला नाही. सिंगापूरच्या अधिकाऱ्यांनी त्याचा मृतदेह कुटुंबाला सोपवण्यापूर्वी शवविच्छेदन केले. परंतु त्याची पत्नी गरिमा गर्ग यांनी सार्वजनिकरित्या प्रश्न उपस्थित केला आहे की तो आजारी असताना त्याला पोहण्याची परवानगी का देण्यात आली? त्याच्या एका बँडमेटने तर विषबाधेची शक्यता वर्तवल्याने निष्काळजीपणापेक्षा त्याच्या मृत्यूभोवती घातपाताचे वलय निर्माण झाले.

आसामच्या मुख्यमंत्र्यांनी न्यायालयीन चौकशीचे आदेश दिले आहेत. त्याच्या मृत्यूप्रकरणी अनेक संशयितांना अटकही करण्यात आली आहे. या प्रकरणाची चौकशी सुरू आहे. मात्र रोज येणारी नवी माहिती त्यांच्या कुटुंबासाठी आणि चाहत्यांसाठी नवी वेदना घेऊन येत आहे. आपल्या मुळांशी घट्ट असलेल्या नात्यामुळे, मातीशी असलेल्या निष्ठेमुळे झुबीनला लोकांच्या हृदयात कायमचे स्थान मिळाले. मात्र, त्याच्या अनुत्तरित अन गूढ मृत्यूने आसामवासीयांच्या मनात भळभळती जखम कायम राहिल.

# ऐन दिवाळीत राजकीय आतषबाजी

**सुयोग आंग्रे**

ऐन दिवाळीच्या दिवसांमध्ये राजकीय डावपेचांनी आतषबाजी पाहावयास मिळणार आहे हे आता निश्चित झाले आहे. राज्यात गेले चार वर्षांपासून असणारा प्रशासक कालावधी संपण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थामधील अधिकारी वर्गाची असणारी दादागिरी संपून राजकीय दादागिरीला सुरुवात होणार आहे. महानगर पालिका, नगरपालिका, नगरपंचायती, पंचायत समिती, जिल्हा परिषद आणि ग्रामपंचायतीच्या निवडणुकांच्या तयारीला सर्वच राजकीय पक्ष लागले आहे. म्हणजे काय तर एकीकडे दिवाळीच्या फराळाच्या बनविण्याचा बेत सुरु असताना दुसरीकडे खुर्चीचा आस्वाद कसा घेता येईल यासाठी पुढाऱ्यांनी राजकीय पटलावर मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी आपल्या डावपेचांनी सुरुवात केली आहे. एकीकडे असंख्य दिव्यांनी दीपमान करणारी दिवाळी आणि दुसरीकडे राजकीय दिवाळी अनुभवण्याची संधी मतदारांना लाभणार आहे.

रायगड जिल्ह्याच्या राजकारणात नेहमीच काहीतरी विशेष घडताना रायगडकरांनी पाहिले आहे. रायगड जिल्ह्यात असणाऱ्या रायगड जिल्हा परिषदेमध्ये ५९ गटांसाठी निवडणूक होणार आहे. नुकतेच या सर्व गटांचे आरक्षण जाहीर झाले आहे. त्याचबरोबर पंचायत समिती गणांच्या निवडणुकीसाठी आरक्षण प्रसिद्ध करण्यात आले आहे. जिल्ह्यातील १५ पंचायत समित्यांवरील सभापती पदाचे आरक्षण जाहीर झाले असून आता इच्छुकांनी तिकीट मिळविण्यासाठी फिल्डिंग लावली आहे. रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद सर्वसाधारण जाहीर झाल्याने आता सर्वच राजकीय पक्षांनी देव पाण्यात बुडवले आहेत. रायगड जिल्हा परिषदेवर सत्ता काबीज करण्यासाठी आता युती आणि आघाडीचा खेळ सुरु होणार आहे. कोण कोणाबरोबर युती आघाडी करणार याची खरी उत्सुकता मतदारांना अधिक असते. त्यामुळे रायगड जिल्हा परिषदेसाठी आता कोणते पक्ष एकत्रित मैत्रीपूर्ण लढत लढणार आणि कोणते राजकीय पक्ष अर्थपूर्ण लढत लढणार हे पाहण्यासाठी रायगडकर सज्ज झाले आहेत.

रायगड जिल्हा परिषदेमध्ये प्रशासक बसविण्यात आला. त्याला सुमारे तीन वर्ष पूर्ण होतील. गेले तीन वर्ष प्रशासकांनी जिल्हा सांभाळला. अधिकाऱ्यांच्या निर्णयावर जिल्ह्याच्या विकासाची धुरा होती. आता न्यायालयाच्या आदेशानुसार जिल्हा परिषदेच्या निवडणूक घेण्याच्या सूचना असल्याने निवडणूक विभाग कमला लागला आहे. निवडणूक विभागाने मतदार यादी प्रसिद्ध केली. नव्याने आरक्षण जाहीर केले. आता केवळ निवडणुईची तारीख जाहीर करून आचारसंहिता लागू करण्याच्या तयारीत निवडणूक विभाग आहे. न्यायालयाच्या सूचनेनुसार डिसेंबरमध्ये जिल्हा परिषद , महानगरपालिका आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका अपेक्षित आहेत. यासाठी रायगड जिल्हा प्रशासनाने निवडणुकांची तयारी पूर्ण करण्यास सुरुवात केली आहे. दुसरीकडे निवडणुकीचे बिगुल कधीही वाजणार यामुळे राजकीय पक्षांनी आपल्या कार्यकर्त्यांना जागे कारण्यास सुरुवात केली आहे. प्रबळ दावेदार असणाऱ्या उमेदवारांची पडताळणी राजकीय पक्षांनी सुरु केली आहे. काही दिवसात संभाव्य उमेदवारांची यादी जाहीर होईल. कोणाला लॉटरी लागेल तर कोण नाराज होईल.परंतु निवडणुका पुढे जाण्याची भीती जाणकार राजकीय विश्लेषकांनी वर्तवली आहे. राज्य पूरग्रस्त झाल्याने ते स्थिरावण्यासाठी काही कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही अशा मानसिकतेत राज्य सरकार न्यायालयात जाऊन निवडणुका पुढे ढकलण्याची मागणी करण्याच्या तयारीत असल्याच्या चर्चांना आता उधाण आले आहे. परंतु हे जर तर वर अवलंबून आहे.

रायगड जिल्हा परिषदेवर सत्ता मिळवण्यासाठी राजकीय पक्ष कंबर कसणारा यात तिळमात्र शंका नाही. यामुळे यावेळी रायगड जिल्हा परिषदेमध्ये शेतकरी कामगार पक्ष, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), उद्धव ठाकरे शिवसेना, शिवसेना शिंदे गट आणि भारतीय जनता पार्टी हे पक्ष आपले राजकीय भविष्य पणाला लावणार आहेत. ५९ जिल्हा परिषद गटांमध्ये आपले अस्तित्व टिकवण्यासाठी इच्छुकांनी आपली प्रचाराची अस्त्रे उपासण्यास सुरुवात केली आहे. आता घोडा मैदान जवळ आले आहे. यामुळे रायगड जिल्हा परिषदेच्या निवडणुकीमध्ये राजकीय उलथापालथ पाहावयास मिळणार आहे. रायगड जिल्ह्याच्या राजकारणाचा विचार करता रायगड जिल्हा परिषदेमध्ये शेतकरी कामगार पक्ष आजही प्रबळ दावेदार असणारा पक्ष आहे. जिल्हा परिषदेच्या इतिहासात सत्तेचे गणित पहिले तर शेतकरी कामगार पक्ष नेहमीच अग्रेसर राहिला आहे. त्याचबरोबर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), काँग्रेस आणि उद्धव ठाकरे शिवसेना गट हे देखील सत्तेच्या राजकारणात राहिले आहेत. या सर्व राजकीय गणिताच्या बेरजेमध्ये भारतीय जनता पार्टी देखील नेहमी चंचुप्रवेश करून पुढे आली आहे. आता शिवसेना शिंदे गटापुढे सत्तेत येण्याचे आव्हान असणार आहे. रायगड जिल्हा परिषदेमध्ये महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असेच काहीसे चित्र असणार आहे. परंतु राजकीय कट्ट्यांवर भाजप आणि राष्ट्रवादी यांची युती अंतिम झाली असून शिंदे गटाला या युतीमध्ये अद्याप स्थान मिळालेले नाही अशी चर्चा आहे. यामुळे शिंदे गट एकाला चालीच्या भूमिकेत रणनीती आकाशात असल्याचे बोलले जात आहे. दुसरीकडे महाविकास आघाडीमध्ये असणाऱ्या राजकीय पक्षांमध्ये सामंजस्याचे वातावरण असून निवडणूक जिंकण्याच्या तयारीला कार्यकर्ते लागले असल्याचे चित्र आहे.

लोकसंसद

## हेन्ली पासपोर्ट इंडेक्सच्या क्रमवारीत भारत ८५ व्या स्थानावर




लंडनस्थित इन्व्हेस्टमेंट मायग्रेशन कन्सल्टन्सी असलेल्या हेन्ली अँड पार्टनर्स या कंपनीने प्रकाशित केलेल्या 'हेन्ली पासपोर्ट इंडेक्स'च्या ताज्या क्रमवारीनुसार सिंगापूरचा पासपोर्ट हा जगातील सर्व देशांत शक्तिशाली पासपोर्ट ठरला असून सिंगापूरच्या पासपोर्ट धारकांना जगभरातल्या १९३ देशांमध्ये व्हिसाशिवाय प्रवेश करता येणार आहे. या यादीत जगातील २२७ देश आणि १९९ पासपोर्टचा समावेश करण्यात आला आहे. तर जपान दक्षिण कोरिया या यादीत दुसऱ्या क्रमांकावर आहेत. भारताचा पासपोर्ट हा २०२५ मध्ये ८० व्या क्रमांकावरून ८५ व्या क्रमांकावर घसरला आहे. भारतीय पासपोर्टधारक आता ५७ देशांमध्ये व्हिसा-फ्री प्रवास करू शकतील. गेल्या वर्षी ही संख्या ५९ देश इतकी होती. भारतीय पासपोर्ट धारकांना भूतान, इंडोनेशिया, मॉरिशस, नेपाळ, त्रिनिदाद आणि टोबॅगो, म्यानमार, श्रीलंका, मालदीव, जॉर्डन, कतार तसेच बोलिव्हिया, कंबोडिया, इथिओपिया, मादागास्कर, मंगोलिया, मोझांबिक, टांझानिया इत्यादी ५७ देशांमध्ये व्हिसा-मुक्त प्रवेश किंवा त्या देशातील आगमनावर व्हिसा देण्यात येतो. या यादीनुसार अमेरिकेचा पासपोर्ट गेल्या दोन दशकांत प्रथमच पहिल्या १० मधून बाहेर पडला असून सध्या अमेरिकेचा पासपोर्ट हा १२ व्या क्रमांकावर आहे. तर जर्मनी, इटली, स्पेन आणि स्वित्झर्लंड हे युरोपियन देश नेहमीप्रमाणे टॉप १० मध्ये स्थान टिकवून आहेत. या क्रमवारीत तळाशी असलेला अफगाणिस्तानचा पासपोर्ट हा जगातील सर्वात कमकुवत पासपोर्ट ठरला आहे.

**-प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# गोरक्षणाचे महत्व सांगणारी 'वसुबारस'

दिपावलीतील पाहिला सण 'वसुबारस'. आश्विन कृष्ण द्वादशीस हा सण साजरा केला जातो. या दिवशी गोधनाची पूजा केली जाते. समुद्रमंथनातून पाच कामधेनू उत्पन्न झाल्या होत्या त्यापैकी नंदा नामक धेनूस उद्देशून हे व्रत केले जाते. अनेक जन्माच्या कामना पूर्ण व्हाव्यात याकरिता वासरासहित गायीची या दिवशी पूजा केली जाते. भारत हा पूर्वीपासून कृषीप्रधान देश असल्याने गोपालनाचे महत्व लोकांवर आधीपासूनच बिंबले आहे. गाईच्या पोटात ३३ कोटी देव असतात असे लहानपणी सांगितले जाई. त्यामुळे गाय दिसली की तिच्या उदराला स्पर्श करून नमस्कार करण्याचा संस्कारच मुलांवर झालेला असे. गाय आणि तिच्या वासरांना कुटुंबातील सदस्याप्रमाणे वागणूक दिली जाई. आज मात्र परिस्थिती बदलली आहे. गेल्या काही वर्षांत देशी गाईंच्या संख्येत कमालीची घट झाली आहे. धनाची निकड भागवण्यासाठी शेतकरी गोधन कसायाला विकू लागला आहे. सरकारने गाईंच्या सन्मानार्थ तिला राज्यमातेचा दर्जा तर दिला आहे; मात्र तिच्या रक्षणासाठी आणि संवर्धनासाठी कोणतेही ठोस धोरण आखलेले नाही परिणामी राज्यात गाईंची संख्या प्रतिदिन घटतच आहे.

गोवंशाने भरलेलया गाड्या पोलिसांकडून किंवा गोरक्षकांकडून पकडल्या गेल्याच्या बातम्या हल्ली प्रतिदिन वृत्तपत्रात वाचायला मिळतात. त्यामुळे राज्यात खरोखर गोवंश हत्याबंदी कायदा आहे का, असा प्रश्न पडतो. जर कायदा अस्तित्वात आहे तर गुन्हेगारांना त्याचे भय का वाटत नाही ? राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा अस्तित्वात येऊन आज १० वर्षांहून अधिक काळ लोटला; मात्र या कायद्यान्वये कोणाला शिक्षा झाल्याचे आजतागायत ऐकिवात नाही. राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा असला तरी गोहत्या थांबलेल्या नाहीत. राज्यात अनेक ठिकाणी आजही प्रतिदिन गोवंश कापले जातात. बकरी ईदच्या निमित्ताने राज्यात हजारो गोवंशाची हत्या केली जाते. हिंदूंना पूजनीय असणाऱ्या गोमातेला आणि गोवंशाला कायद्याने संरक्षण मिळावे म्हणून हा कायदा करण्यात आला, मात्र कायद्याची अंमलबजावणी आज केवळ कागदावरच होताना दिसतेय. कोणतेही शुभकार्य असो किंवा धार्मिक पूजाविधी असो गोग्रास दिल्याशिवाय ते पूर्ण होतच नाही. स्थानाची आणि वास्तूची शुद्धी करण्यासाठी गोमूत्र शिंपडले जाते. यज्ञादी विधीच्या ठिकाणी सात्विकता निर्माण व्हावी यासाठी तेथील भूमी गाईच्या शेणाने सारवली जाते. गोमातेच्या दुधाला तर अमृताची उपमा दिली जाते. लहान बाळाला आई नंतर पहिले दूध गाईचेच दिले जाते. गायीच्या दुधाचे महत्व शास्त्रज्ञांनीही मान्य केले आहे. गाईच्या दुधापासून अनेक दुग्धजन्य पदार्थांची निर्मिती केली जाते ज्यातून गोपालन करणाऱ्याला वर्षभर उत्पन्न मिळते. देशी गाईचे तूप हे अनेक आजारांवर अत्यंत गुणकारी मानले जाते. गाय ही भारतीय संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे त्यामुळे ती उपयुक्त आणि श्रद्धेय का आहे याचा उल्लेख प्राचीन धर्मग्रंथांत आढळतो. वसिष्ठ ऋषींनी गोमातेवर संशोधन करू गाईच्या अनेक प्रजाती निर्माण केल्या. गोपालनाचे महत्व साक्षात भगवान श्रीकृष्णाने स्वतः गोपालन करून दर्शवले आहे, दत्तगुरुंनीही गोमातेची महती वर्णिली आहे. छत्रपती शिवरायांनी गोहत्येसाठी सरसावणारे कसायाचे हात जागेवर कलम करून गोरक्षणाचे महत्व रयतेवर बिंबवले होते. महाराजांनी हिंदवी स्वराज्यात गोपालनाला विशेष महत्व दिले. त्यामुळेच महाराजांना गोब्राह्मण प्रतिपालक म्हटले जाते. छत्रपतींच्या राज्यात गोमातांवर ओढवलेली ही परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे. राष्ट्रीय स्तरावर गोवंश हत्याबंदी कायदा करण्याची मागणी मागील अनेक वर्षांपासून केली जात आहे मात्र राजकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. गोमाता जसे हिंदूंचे श्रद्धास्थान आहे तशी ती सर्वांत उपयुक्त प्राणी असल्याचेही जागतिक स्तरावर सिद्ध झाले असताना गायीच्या रक्षणाचे कोणतेच प्रावधान केंद्र शासनाने आजतागायत केलेले नाही याउलट बीफ व्यवसायात अनेक नेतेमंडळींचे आर्थिक हितसंबंध आहेत. देशात अशीच गोहत्या होत राहिली तर उद्या नावालाही गोवंश शिल्लक राहणार नाही.

**- जगन घाणेकर**

## सुवर्णकण



आपण जसजसे उन्नत होऊ आपण जसजसे निरी च्छ होवूं तस तशी आपली भक्ती निष्काम होत जाईलच

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण.**

# जगभरात पुण्याची 'पॉवर' भारी

## ●१ हजार ४०० विमानांमध्ये जीईचे इंजिन

**। पुणे । प्रतिनिधी ।**

**जीई एरोस्पेस कंपनीच्या चाकणमधील प्रकल्पातून विमान इंजिनांसाठी महत्त्वाच्या सुट्या भागांची निर्मिती केली जात आहे. या भागांचा वापर करून तयार करण्यात आलेल्या इंजिनचा पुरवठा जगभरातील विमान कंपन्यांना केला जात आहे. या सर्व कामांचे नियोजन करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) उपयोग करण्यात येत असल्याची माहिती जीई एरोस्पेस कंपनीच्या जागतिक निर्मिती प्रक्रिया व पुरवठा साखळीचे कार्यकारी संचालक अमोल नागर यांनी नुकतीच दिली.**



जीईचा पुण्यातील चाकणमधील प्रकल्प २०१४ मध्ये सुरू झाला. त्याच्या दशकपूर्तीच्या पार्श्वभूमीवर गतवर्षी कंपनीने या प्रकल्पात २४० कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. भारतात सेवेत असलेल्या १ हजार ४०० विमानांमध्ये जीईची इंजिन वापरली जातात. जगातील प्रमुख विमान कंपन्यांकडून जीईच्या इंजिनचा वापर केला जात आहे. विमानांच्या इंजिनना मागणी वाढल्यास सुट्या भागांचीही मागणी वाढली आहे. यासाठी कंपनीने चाकणमधील प्रकल्पाच्या उत्पादन क्षमतेचा विस्तार करत आहे.

याबाबत नागर म्हणाले, पुण्यातील प्रकल्पातून बाहेर पडणाऱ्या सुट्या भागांचा वापर लीप, जीईएनएक्स आणि जीई९एक्स या विमान इंजिनसाठी केला जातो. जवळपास हजाराहून अधिक सुट्या भागांचा वापर इथे केला जातो. एआयच्या माध्यमातून प्रचंड डेटाचे विश्लेषण सोपे झाल्याने, भविष्यातील कामकाजाचे नियोजन सुलभ झाले आहे.

केवळ कर्मचाऱ्यांनाच नव्हे तर अभियांत्रिकी पदविकेच्या विद्यार्थ्यांनाही कौशल्य विकासाचे धडे दिले जात आहेत. त्यासाठी विविध महाविद्यालयांशी भागीदारी करण्यात आली आहे. आतापर्यंत पाच हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना विमाननिर्मिती क्षेत्राचे प्रशिक्षण दिल्याची माहिती जीई एरोस्पेसच्या चाकण प्रकल्पाचे व्यवस्थापकीय संचालक विश्वजित सिंह यांनी दिली. विद्येचे माहेरघर म्हणून नेहमीच पुण्याचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. परंतु, आता सर्वाधिक विमानांना इंजिन बसविण्यातही पुणे आघाडीवर येत असल्याने जगात वेगळी ओळख निर्माण होत आहे. यातून मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मितीसुद्धा होत असल्याचे बोलले जात आहे.

## परतीच्या पावसाने घरांचे नुकसान

**। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी ।**

ढगांचा गडगडाट व विजांच्या कडकडाटासह बुधवारी सायंकाळी पडलेल्या परतीच्या पावसाचा देवगड तालुक्याला तडाखा बसला. या पावसामुळे शिरगाव-राकसघाटी, निमतवाडी परिसरातील १२ घरांचे चक्रीवादळाने मोठे नुकसान झाले. बुधवारी रात्री उशिरापर्यंत नुकसानीचा पंचनामा सुरू होता.

बुधवारी सायंकाळी ४ वा.नंतर ढगांचा गडगडाट व विजांच्या कडकडाटासह परतीच्या पावसाने हजेरी लावली. गेले काही दिवस कडक ऊन पडल्यानंतर बुधवारी सायंकाळी वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावल्याने वातावरणात गारवा निर्माण झाला होता, मात्र वीजांच्या कडकडाटाने सुरू झालेल्या पावसाचा तडाखा शिरगाव भागाला बसला.

देवगड-नांदगाव मार्गावर शिरगाव ग्रामपंचायतीनजिक रस्त्यावर मोठे झाड कोसळल्याने वाहतूक ठप्प झाली होती. जेसीबीच्या सहाय्याने अर्ध्या तासाच्या अथक प्रयत्नाने झाड बाजुला करून वाहतूक सुरळीत करण्यात आली.

## आयुक्तांच्या वाहनासमोर लोटांगण

**। पुणे । प्रतिनिधी ।**

कळस, धानोरी व लोहगावमधील नागरी प्रश्नांसंदर्भात वारंवार निवेदने देऊनही प्रश्न सुटत नाहीत. त्यामुळे धनंजय जाधव व पूजा जाधव यांनी धानोरी मुख्य रस्त्यावर महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या वाहनासमोर लोटांगण घेत अभिनव पद्धतीने महापालिका प्रशासनाचा निषेध नोंदवला. दिवसभर समाजमाध्यमांमध्ये या आंदोलनाचे व्हिडीओ व्हायरल झाल्याने परिसरात चर्चेचा विषय झाला होता.

पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम काही कामानिमित्त बुधवारी (दि.१६) सकाळी धानोरीत आले होते. तेथील काम आटोपून लोहगावमार्गे वाघोलीकडे जात असताना धानोरी मुख्य रस्त्यावर आयुक्तांच्या वाहनासमोर धनंजय जाधव व पूजा जाधव यांनी लोटांगण घेतले. या वेळी 'जागे व्हा, जागे व्हा, पालिका प्रशासन जागे व्हा', 'झोपलेल्या पालिका प्रशासनाचा निषेध असो', अशा घोषणा जाधव दाम्पत्य व उपस्थित कार्यकर्त्यांकडून देण्यात आल्या. मात्र, आयुक्तांसोबत असलेल्या सुरक्षा रक्षकांनी तातडीने पुढे होत जाधव दाम्पत्याला बाजूला केले. अचानक झालेल्या या प्रसंगाने वैतागलेल्या आयुक्तांनी 'तुम्हाला इथे कुणी पाठवले', असा सवाल जाधव यांना केला. यावेळी आम्ही स्वतःच आल्याचे जाधव म्हणाले.

## विद्यार्थ्यांना टी-शर्ट वाटप

**। तळे । प्रतिनिधी ।**

मिसाईल मॅन, भारताचे माजी राष्ट्रपती डॉक्टर ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या वाढदिवसानिमित्त देशभरात १५ ऑक्टोबर हा दिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. त्याचे औचित्य साधून आज रायगड जिल्हा परिषद तळे मराठी मुलांच्या शाळेत टी-शर्ट वाटप कार्यक्रम उत्तमरीत्या पार पडला.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भास्कर गोळे होते, तर व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून रायगडभूषण, पत्रकार पुरुषोत्तम मुळे, नगरसेवक नरेश सुर्वे, नगरसेवक सिराज खाचे, तळा केंद्रप्रमुख वासकर मूबीन, माजी केंद्रप्रमुख संदीप जामकर, सुभाष मुंढे, उर्दू शाळेचे मुख्याध्यापक श्री. राऊत, शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष सौ. गौरविले, मुख्याध्यापिका सुप्रिया जामकर, मित्तल वावेकर-मुळे, वर्षा माडे, राजू थिटेकर, ॲड. बोडके, विशाखा देवरुस्कर व पालक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नगरसेवक नरेश सुर्वे, नगरसेवक सिराज खाचे, केंद्रप्रमुख मूबीन वासकर, शैलेश घोलप, प्रकाश लाडगे, संदीप जामकर, मुख्याध्यापक राऊत या सर्वांनी आर्थिक मदत केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मितल वावेकर-मुळे यांनी केले, तर सुप्रिया जामकर यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

## भेसळयुक्त अन्नपदार्थ जप्त

**नागपूर :** दिवाळीच्या पार्श्वभूमीवर भेसळीच्या अन्नपदार्थांची विक्री वाढल्याने अन्न व औषध प्रशासनाच्या दक्षता विभागाने मोठी कारवाई केली आहे. गेल्या काही दिवसांत विभागाने नागपूरसह परिसरात विविध ठिकाणी धाड टाकून तेल, पनीर, खोवा आणि दही यांसारख्या अन्नपदार्थांचा तब्बल ५७ लाख रुपयांचा साठा जप्त केला आहे. तसेच अस्वच्छ व अनारोग्यदायी वातावरणात रसगुल्ला तयार करणाऱ्या दोन कारखान्यांना उत्पादन बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

अन्न व औषध प्रशासनाच्या विशेष मोहिमेंतर्गत 'सण महाराष्ट्राचा संकल्प अन्नसुरक्षिततेचा' या उपक्रमाअंतर्गत ही कारवाई करण्यात आली. या मोहिमेदरम्यान एकूण ३२ नमुने घेऊन सुमारे २८,८३७ किलो अन्नसाठा जप्त करण्यात आला. त्यामध्ये खाद्यतेलाचे १८ नमुने, एकूण ३३,२७८ किलो, किंमत ४७,६४,१३८, पनीर आणि खोवाचे ३ नमुने, एकूण ५२२ किलो, किंमत १,२६,९८०, दहीचे ३ नमुने, एकूण ६,१८४ किलो, किंमत २,५२,४५६, मिठाईचे २ नमुने, एकूण १,७०६ किलो, किंमत २,७२,९६०, अशा प्रकारे एकूण ५७,९८,२१७ रुपयांचा साठा जप्त करून नाशवंत व भेसळीचा संशय असलेले पदार्थ नष्ट करण्यात आले.

## अवकाळीमुळे बळीराजा बेजार

**। पालघर । प्रतिनिधी ।**

गेल्या दिवसांपासून हवामानाच्या लहरीपणामुळे सर्वत्र बळीराजा पुरता बेजार झाल्याचे चित्र आहे. काहि दिवसांपूर्वी जिल्ह्यासह सर्वत्र झालेल्या अवकाळी पावसामुळे सर्व पिकांचे, घरांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यातून सावरत असतानाच येत्या दोन दिवसात पुन्हा जिल्ह्यात काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आल्यामुळे बळीराजांच्या चिंतेत पुन्हा भर पडली आहे.



प्रादेशिक हवामान खात्याच्या अंदाजानुसार जिल्ह्यातील काही भागात वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज व्यक्त केल्यामुळे शेतकऱ्यांनी तयार कापण्या स्थगित ठेवल्या आहेत. तर मागील काही दिवसांपासून पडलेल्या छान उन्हामुळे अगदी तयार झालेल्या हलवार पीक कापण्या ज्या शेतकऱ्यांनी केल्या होत्या, त्या पूर्ण सुकल्या नसल्या तरी त्यांना सुरक्षित स्थळी ठेवून वाचवण्यासाठी शेतकऱ्यांची धावपळ उडाली आहे.

हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार १७ ऑक्टोबर रोजी जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह पाऊस बरसणार आहे. यामध्ये मेघ गर्जनेसह विजांचा कडकडाटसुद्धा होणार असल्याचा तर्क देण्यात आला आहे. तर १८ ऑक्टोबर रोजी जिल्ह्यातील वाडा,जव्हार आणि विक्रमगड तालुक्यात हलक्या स्वरूपाचा पाऊस अंदाजित असून, जव्हार तालुक्यात हलक्या स्वरूपाचा पाऊस होणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. परिणाम जिल्ह्यातील तयार हलवार व निम गरवार पिकांच्या कापण्या शेतकऱ्यांनी लांबणीवर टाकल्या आहेत.

यामुळे आधीच हैराण शेतकऱ्यांना आता लांबून आणलेल्या मजुरांची मजुरी व जेवणखाणे यांच्या खर्चाचा अतिरिक्त भार सहन करावा लागणार आहे. यंदाच्या सततच्या पावसामुळे सर्वत्र जमीन ओलीच असल्याने शेतखळे करणे शक्य होत नाही. त्यामुळे कापणी केलेले पीक घरांच्या ओट्यावर कसेबसे ठेवण्याची पाळी त्यांच्यावर आली आहे.

## कुत्र्यांचा चिमुकल्यांना चावा

**नवीन पनवेल:** दोन चिमुकल्यांना भटक्या कुत्र्याने चावा घेतल्याची घटना १५ ऑक्टोबर रोजी कामोठेत घडली. या भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

कामोठे सेक्टर ११ येथून इयत्ता पहिलीत शिकणारा सात वर्षीय मुलगा आणि सहा वर्षीय मुलीवर भटक्या कुत्र्याने अचानक हल्ला केला आणि त्यांचा चावा घेतला. कुत्र्याच्या हल्ल्यात दोघेही गंभीर जखमी झाले. तळोजा परिसरात चार दिवसांपूर्वी अशाच प्रकारे भटक्या श्वानांनी काही जणांना चावा घेतला होता. त्यानंतर १५ ऑक्टोबर रोजी कामोठे परिसरात ही घटना घडली. पनवेल महापालिका हद्द आणि पनवेल तालुक्यात भटक्या कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. त्यामुळे मानवी जीविताला धोका निर्माण होत आहे. या भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे. अन्यथा याविरोधोत तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

## प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ

**मुंबई :** आदिवासी कल्याण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती आणि सामाजिक संस्थांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी आदिवासी विकास विभागामार्फत 'भगवान बिरसा मुंडा आदिवासी भूषण पुरस्कार' तसेच 'भगवान बिरसा मुंडा आदिवासी भूषण संस्था पुरस्कार' देण्यात येतात. या पुरस्कारांसाठी प्रस्ताव स्वीकारण्यासाठी २५ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. जास्तीत जास्त व्यक्ती आणि संस्थांनी प्रस्ताव प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी केले आहे.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे-कुशिवली, तालुका-कर्जत, जि.रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| श्रीम.शकुंतला गुलिया | ४३ | १/ब | ०-०९-४० पो.ख<br>०-०१-५० एकूण<br>०-१०-९० क्षेत्र<br>मिळकत | १-०१ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकतीच्या कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा कोणत्याही व्यक्तींची अगर संस्थांची आमच्या अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत पुराव्यासोबत लेखी स्वरूपात हरकत कळवावी. वरील मूदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील जमिन मिळकतीशी कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थांचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, तसेच कोणत्याही व्यक्तीची अगर संस्थांची आमचे अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत नाही किंवा असल्यास ती हरकत त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेली आहे असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. १६/१०/२०२५

अधिवक्ता
**शैलेश दत्तात्रेय पवार**
पत्ता. घर क्र. ३, नेमीनाथ हाईट्स शेजारी,
मुद्रे बु.कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड,
मो. ९५९५२११८६७



**महाराष्ट्र शासन**
**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
Email :- mahad.ee@mahapwd.com ph. No. (०२१४५) २२२१६७
**निविदा सूचना क्रमांक २८ सन २०२५-२०२६**

खालील कामासाठी सिलबंद निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड, मु.पो.ता.महाड, जिल्हा रायगड पिनकोड नं.४०२३०१ दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ हे महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून बी-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. कोऱ्या निविदा नमुना दिनांक १६/१०/२०२५ रोजी सकाळी १०.०० पासून ते दिनांक २३/१०/२०२५ रोजी १८.०० वाजे पर्यंत www.mahapwd.gov.in या संकेत स्थळावरून ऑनलाईन खरेदी करण्यात येतील. व दिनांक २४/१०/२०२५ रोजी संध्याकाळी १०.०० वाजेपर्यंत ऑफलाईन पद्धतीने या कार्यालयात सादर कराव्यात व कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग, महाड हे भरून पाठविलेल्या निविदा शक्यतो दिनांक २४/१०/२०२५ रोजी ११.०० वाजता उघडतील. निविदा उघडताना सर्व कंत्राटदारांची उपस्थिती राहणे आवश्यक आहे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवला आहे.

| अनु क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुरूड तळेखार कोलाड विळे रस्ता प्रारामा.०५ कि.मी.६५/३०० मध्ये पाईप मोरीचे बांधकाम करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (पुरहानी दुरूस्ती) | ८४५०८० | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| २ | मुरूड तळेखार कोलाड विळे रस्ता प्रारामा.०५ कि.मी.६४/९०० मध्ये पाईप मोरीचे बांधकाम करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (पुरहानी दुरूस्ती) | ८४२३७० | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ३ | ढालघर होडगांव घरोशी रस्ता प्रजिमा ६२ कि.मी.९/७८० मध्ये पाईप मोरीचे बांधकाम करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड (पुरहानी दुरूस्ती) | ८४४७६६ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ४ | ढालघर होडगांव घरोशी रस्ता प्रजिमा ६२ कि.मी.९/७०० मध्ये पाईप मोरीचे बांधकाम करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड (पुरहानी दुरूस्ती) | ८४३०९२ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ५ | मुरूड तळेखार कोलाड विळे रस्ता प्रारामा.०५ कि.मी.६४/२०० मध्ये पाईप मोरीचे बांधकाम करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (पुरहानी दुरूस्ती) | ८४३७४७ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ६ | मुरूड तळेखार कोलाड विळे रस्ता प्रारामा.६२ कि.मी.९/३०० मध्ये पाईप मोरीचे बांधकाम करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (पुरहानी दुरूस्ती) | ८४५९७३ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ७ | विळे पाटणूस रस्ता रा.मा.९८ कि.मी.७९/१०० मध्ये पाईप मोरीचे बांधकाम करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड (पुरहानी दुरूस्ती) | ८४५१२५ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ८ | खरवली पेण उसर तळेगांव पन्हेळी रस्ता प्राजिमा ६० कि.मी. १०/२०० मध्ये पाईप मोरीचे बांधकाम करणे. तालुका तळा, जिल्हा रायगड (पुरहानी दुरूस्ती) | ८४५२७५ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ९ | खरवली पेण उसर तळेगांव पन्हेळी रस्ता प्राजिमा ६० कि.मी. १०/५०० मध्ये पाईप मोरीचे बांधकाम करणे. तालुका तळा, जिल्हा रायगड (पुरहानी दुरूस्ती) | ८४५५९७ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| १० | मौजे पहेल ता.माणगांव येथे अंतर्गत रस्ता तयार करणे. तालुका माणगांव जिल्हा रायगड | ६८०२२६ | ७००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ११ | वरंडोली वरेकोंड ता.महाड येथे सभामंडप बांधणे, तालुका महाड, जिल्हा रायगड | ६७२७१५ | ७००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |

टिप : १) तपशीलवार निविदा सुचना https//mahapwd.gov.in संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील.
जा.क्र.मवि/लेशा/निविदा/३९५६
दिनांक :- १४/१०/२०२५

सही/-
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

**विमाका/ कोवि/२०२५-२०२६/१४२**


## निवडक

### रेल्वेच्या प्रतीक्षालयाची दुरवस्था

**ठाणे :** ठाणे रेल्वे प्रशासनाने उभारलेल्या प्रतीक्षा कक्षामध्ये दिवसेंदिवस अस्वच्छतेच्या प्रमाणात वाढ होऊ लागल्याचे दिसून येत आहे. ठाणे रेल्वे प्रशासनाने ऑगस्ट महिन्याच्या अखेरीस दुसरे प्रतीक्षा कक्ष प्लॅटफॉर्म १ वर उभारले होते. मात्र, अवघ्या २ महिन्यातच प्रतीक्षा कक्षात अस्वच्छतेचे प्रमाण दिवसेंदिवस वाढू लागले आहे. प्रतीक्षा कक्षाजवळील परिसर तसेच कक्षाच्या स्वच्छतागृहाचे सांडपाणी आजूबाजूच्या परिसरात साचत असल्याने रेल्वे स्थानकावर प्रवास करणाऱ्या प्रवाशांना दरदिवशी घाणीचा सामना करावा लागत आहे. तसेच ठाणे रेल्वे स्थानक स्वच्छ राहात नसल्यामुळेच अवघ्या २ महिन्यातच वेटिंग रूम खराब झाल्याचे दिसून येत आहे. प्रतीक्षा कक्षाचा वापर करणाऱ्या प्रवाशाने कक्षाचे शौचालय किती अस्वच्छ असून तिथे रेल्वे स्थानकावरील स्वच्छता-साफसफाई वेळीच होत नसल्याचे सांगितले. अलिकडील महिन्यांमध्ये ठाणे रेल्वे प्रशासनाने प्लॅटफॉर्म क्रमांक २ आणि १ वर वेटिंग रूम उभारले; परंतु वेटिंग रूमच्या स्वच्छतागृहाची आणि रूमच्या आजूबाजूच्या परिसराची नीट दक्षता न घेतल्याचे आढळून येते. बऱ्याचवेळा वेटिंग रूम बाजूच्या जागेत प्रवाशांची वर्दळ असते. त्याच जागी रेल्वे प्रशासनाने कंत्राट दिलेल्या कंत्राटदारांकडून वेटिंग रूमच्या स्वच्छता- गृहाचे सांडपाणी सोडून ठेवले. कित्येकदा सोडलेल्या सांडपाण्याचा एकाच जागी साठा होतो व साठलेल्या पाण्यामुळे त्या जागेवर दुर्गंधी पसरते. बऱ्याचवेळा प्रवाशाने या परिस्थिती संदर्भात रेल्वे प्रशासनाकडे तक्रार केली होती. रेल्वे प्रशासनातर्फे तात्काळ परिसर स्वच्छ करू असे सांगितले आहे.

### संघटित कामगार फ्रंटच्या लढ्याला यश



**पाताळगंगा :** पाली फाटाजवळ असलेल्या निमा सोप कारखान्यात सलग सहा वर्षे प्रामाणिकपणे सेवा बजावणारे सतीश जाधव यांना कंपनीतून सेवानिवृत्तीनंतर रिकाम्या हाताने जावे लागले. मात्र, त्यांनी केलेल्या सेवेचे फळ त्यांस मिळावे यासाठी संघटित कामगार फ्रंट (महाराष्ट्र राज्य) अध्यक्ष भगवान ढेबे यांच्या मध्यस्थीने अखेर न्याय मिळवून ५१,२०९/- इतकी थकबाकी रक्कम देण्यात आल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले. फ्रंटचे संस्थापक अध्यक्ष भगवान ढेबे (महाराष्ट्र राज्य कार्यकारिणी सदस्य, राष्ट्रीय समाज पक्ष) यांच्या प्रयत्नांनी आणि निमा सोप कंपनीचे व्यवस्थापन व संबंधित कंत्राटदार यांच्या सहकार्याने जाधव यांस धनादेश देण्यात आला.

### लहान भावामुळे वाचले प्राण

**मुंबई :** अकोला येथील १६ वर्षीय मुलाला रक्ताचा कर्करोग झाल्याने त्याच्यावर बोन मॅरो प्रत्यारोपण करणे आवश्यक होते. परंतु उपचाराचा खर्च कुटुंबाला उपचार परवडणारा नव्हता. या संकटाच्या काळात १२ वर्षीय लहान भावाने मोठ्या भावाला स्टेम सेल्स दान करून त्याचे प्राण वाचवले. तर आर्थिक मदतीसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाने पुढाकार घेतल्याने हे उपचार शक्य झाले. जीवन (नाव बदलले आहे) हा १६ वर्षीय मुलगा आई-वडिल आणि १२ वर्षीय लहान भावासोबत अकोला येथे राहतो. वडील मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. काही महिन्यांपासून जीवन सतत आजारी पडत होता. रक्त तपासणीतून जीवनला रक्ताचा कर्करोग असल्याचे निदान झाले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी उपचाराकरिता बोन मॅरो प्रत्यारोपणाचा सल्ला दिला. तसेच उपचारासाठी सुमारे २५ ते ३० लाख रुपये खर्चाचा अंदाज वर्तविला. या परिस्थितीत डॉक्टरांनी 'मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून आर्थिक मदत घेण्याचा सल्लाही दिला होता. मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या पुढाकारातून, टाटा ट्रस्टच्या मोठ्या योगदानातून तसेच काही सामाजिक संस्थांच्या सहकार्याने एकूण २५ लाखांची मदत उभी करण्यात आली.

### वाचनाच्या सवयीमुळे मनुष्याची ज्ञानसमृद्धी

**सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांचे प्रतिपादन**

**मुंबई :** ग्रंथ हे मनुष्याचे मित्र असावेत. प्रत्येकाने सतत वाचत राहिले पाहिजे. ही वाचनाची सवय मनुष्याला ज्ञान समृद्धी मिळवून देत असल्याचे प्रतिपादन मराठी भाषा विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांनी केले. वाचन प्रेरणा दिनानिमित्त मंत्रालयात आयोजित ग्रंथ प्रदर्शनाला भेट देण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले. माजी राष्ट्रपती ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त १५ ऑक्टोबर वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनानिमित्ताने मराठी भाषा विभाग, भाषा संचालनालय यांच्यावतीने मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगणात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी सचिव श्री. कुलकर्णी बोलत होते. सुरुवातीला माजी राष्ट्रपती डॉ. कलाम यांच्या प्रतिमेला उपस्थित मान्यवरांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले. कार्यक्रमास कौशल्य विकास विभागाचे प्रधान सचिव मनीषा वर्मा, गृह विभागाचे प्रधान सचिव राधिका रस्तोगी, साहित्य मंडळाच्या सचिव मीनाक्षी पाटील, भाषा संचालक अरुण गीते आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कक्ष अधिकारी वासंती काळे आणि आभार उपसंचालक राज्य मराठी विकास संस्था अंजली धमाळ यांनी केले.

### निकम विद्यालयात वाचन प्रेरणा दिन

**चिपळूण :** माजी राष्ट्रपती व महान वैज्ञानिक डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीदिनानिमित्त येथील गोविंदराव निकम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी उपमुख्याध्यापक विजय चव्हाण यांच्या हस्ते भित्तिपत्रकाचे अनावरण करण्यात आले. खुशबू माळी हिने सूत्रसंचालन केले. स्वरा धावडे हिने पुस्तक वाचनाचे महत्त्व सांगितले. शिल्पा राजे-शिर्के यांनी विद्यार्थ्यांना वाचनाची आवड जोपासण्याचे महत्त्व पटवून दिले. निधी राडे हिने आभार मानले. समृद्धी कदम, ग्रंथपाल अनुष्का काजरोळकर यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले.

### वलपमध्ये रंगणार दिवाळी पहाट

**नवीन पनवेल :** पनवेल तालुक्यातील वलप गावामधे गतवर्षी प्रमाणे यावर्षी ही लक्ष्मी पूजनच्या शुभ मुहूर्तावर मंगळवार, दि. २१ ऑक्टोबर रोजी सकाळी ६.३० वा. गुरूवर्य शंकुनाथ बुवा पडघेकर, विष्णुबुवा वावंजेकर, पद्माकर बुवा खारघर, मधुकरबुवा धोंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली जय हनुमान प्रासादिक भजन मंडळ व मित्र मंडळ वलप यांच्या विद्यमाने दिवाळी पहाटचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी गायक-अमित पाटील खारघर, महेश पाटील पेनधर, राजाबुवा भोईर पडघे यांच्या मधुर आवाजात पखवाज साथ करतील कुमार केणी पेठाली व तबला- ॲड. सूरज गोंधळी यांनी खेरणे ह्या संगीत मैफिलीचा सर्व नागरिकांनी आनंद घ्यावा, असे आवाहन ग्रामस्थ मंडळ वलपच्या वतीने करण्यात आले आहे.

## निवडक



### सेवानिवृत्त शिक्षक संघटनेची सभा

**खरोशी :** अखिल पेण तालुका सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघाची त्रैमासिक सभा शिक्षक पतपेढी पेण याठिकाणी संपन्न झाली. तालुका अध्यक्ष राजाराम गावंड यांनी तालुक्यातील सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी तालुका कार्यकारिणी व जिल्हा कार्यकारिणी प्रयत्नशील असल्याचे सांगितले. तर जिल्हा अध्यक्ष अमरचंद पाटील यांनी पेन्शन, गटविमा, फंड, वरिष्ठ वेतनश्रेणी, निवड श्रेणी या विषयी सखोल चर्चा केली. बा. ल. म्हात्रे यांनी सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांच्या समस्या सोडवण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याचे सांगितले. शेवटी प्रदीप म्हात्रे यांनी आभार मानले. सभा यशस्वी करण्यासाठी पांडुरंग म्हात्रे, मुरलीधर म्हात्रे, विश्वनाथ कोठेकर, अरविंद चव्हाण, सतिश नवाळे, उत्तरा पाटील, अलका मोकल, सीमा सुर्वे, आशा म्हात्रे आदिनी भरपूर मेहनत घेतली.



### आमटेम शाळेत फराळाचे वाटप

**खरोशी :** पेण तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आमटेम येथे सोबती संस्थेतर्फे ॲड. बापूसाहेब नेने ॲड. मंगेश नेने व त्यांच्या सहकार्याने गरीब व गरजू विद्यार्थ्यांना दिव-ाळीपूर्वी फराळ व शैक्षणिक साहित्य वाटप करून त्यांच्या जीवनात गोडवा निर्माण केला. शालेय विद्यार्थ्यांना खोबरेल तेल, टूथपेस्ट साबण, फेस पावडर, फरसाण, शाळा उपयोगी व घर उपयोगी वस्तू वाटप केले. या कार्यक्रम प्रसंगी मुख्याध्यापिका वावेकर, नंदिनी पाटील, शिक्षक वृंद तसेच पालक वर्ग आणि विद्यार्थी वर्ग उपस्थित होते.

### रायगडची भूमी जगाला प्रेरणा देणारी

**माणगाव :** सोळाव्या शतकामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी जुलमी सत्तेचा नायनाट करून स्वराज्य निर्माण केलं तर २० मार्च १९२७ रोजी महाडच्या चवदार तळ्याचे पाणी सर्व प्राणी मात्राला खुलं करून संपूर्ण जगाला जो आदर्श घालून दिला तो आदर्श पाहून या रायगडच्या मातीला नेहमी नतमस्तक व्हावे असे वाटते कारण रायगडची भूमी जगाला प्रेरणा देणारी असल्याचे मत अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य ॲड. गोरक्ष लोखंडे यांनी व्यक्त केले. याप्रसंगी पी. एम. मसुरे, रवींद्र मोरे, संदीप खरंगटे, रामकिशन माने आदी मान्यवर उपस्थित होते.

### संज्योती यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील माणिवली येथील जिल्हा परिषद शाळेच्या उप शिक्षिका संज्योती कांबरी यांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. २०२५ मधील आदर्श शिक्षक पुरस्कारमध्ये कर्जत तालुक्यातून आदर्श शिक्षिका म्हणून संज्योती कांबरी यांना जाहीर झाला होता. संज्योती संतोष कांबरी या कर्जत तालुक्यातील माणिवली येथील जिल्हा परिषद शाळेत उपशिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. रायगड जिल्हा परिषदेत शिक्षिका म्हणून १८ वर्षे सेवा बजावली असून त्यांचे शिक्षण एम. ए. बी. एड पर्यंत झाले आहे. त्यांनी सुरुवातीला खालापूर तालुका नंतर कर्जत तालुका नंतर रोहा तालुक्यात आणि आता उप शिक्षिका म्हणून सेवा बजावल्यावर गेल्या काही वर्षापासून कर्जत तालुक्यातील माणिवली येथे सेवेत आहेत. २००६ पासून संज्योती कांबरी या जिल्हा परिषदेचे सेवेत असून त्यांचे पती संतोष कांबरी यांना यापूर्वी रायगड जिल्हा परिषदेने आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.



### इकबाल कुर यांचे निधन

**सोगाव :** अलिबाग तालुक्यातील सोगाव येथील ज्येष्ठ नागरिक तथा मापगाव ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच वसीम कुर यांचे वडील इकबाल कुर (वय ७७) यांचे बुधवार (दि.१५) ऑक्टोबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. याबाबत सर्व स्तरांतून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. कुर यांच्या निधनाची माहिती मिळताच त्यांचे नातेवाईक, मित्रपरिवार तसेच राजकीय, सामाजिक आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अंत्यदर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, पुतणे, पुतण्या, भावजय, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.




## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **अकाऊटंट पाहिजे.** पात्रता- Bcom, Tally अनुभव- ५ वर्षे ठिकाण- बामणसुरे, चोंढी, पगार २५००० महिना, Contact- 9823585321
- **अलिबागमध्ये समर्थ मठ, पिंपळभाट,** गोंधळपाडा, रेवस बायपास परिसरामध्ये २ BHK प्रशस्त रूम असलेला, २ टॉयलेट असलेला, पार्किंग असलेला, रेडीपोझिशन फ्लॅट त्वरीत विकत घेणे आहे. फ्लॅट दहा वर्षापेक्षा जास्त जूना नको. फ्लॅट ग्राऊंड फ्लोअर किंवा टॉप फ्लोअर नको एजंटचे स्वागत आहे. मो. ७७५८९७५४०७
- **सहारा ट्रॅव्हल्स** अलिबागमध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे. वय २५ ते ४५ संपर्क :९२७०५६०४५६
- **अलिबागमध्ये कळंबादेवी** मंदिर शेजारी नवीन बिल्डिंग पहिल्या मजल्या वरचे सलग दोन गाळे विकणे /भाड्याने देणे आहे. संपर्क ९१४६६८५१००
- **अलिबाग रेवस रोड** (RCF) कंपनीजवळ भाड्याने दोन सेमी फर्निश रुम देणे आहेत. गेस्ट हाऊस अथवा लॉजिंग साठीही चालू शकेल. संपर्क : ७५०७३०१३५१/९२७०४९८०९९

दिवाळीच्या सणासुदीला बाजारात आकाश कंदिलांना मोठे स्थान आहे. दिवाळीसाठी संपूर्ण बाजारपेठ विविध प्रकारच्या वस्तूंनी सजते. त्यात विविध रंगांचे आकर्षक कंदील ग्राहकांचे लक्ष वेधून घेतात. बाजारात कागदी, प्लास्टिक, ग्लासपासून बनवलेले आकाश कंदील आहेत. ग्राहकांकडूनही या आकर्षक कंदिलांना मोठी मागणी आहे. इतर साहित्यापासून तयार केलेल्या कंदिलांसह मातीचे कंदील विकत घेण्यास ग्राहक प्राधान्य दर्शवत असल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात आले.

अनेक वर्षांपूर्वी बांबूच्या काठ्या आणि कागद यांच्या मदतीने घरातच बनवलेले कंदील वापरले जात. नंतर त्यांची जागा प्लास्टिकच्या कंदिलांनी घेतली; परंतु गेल्या काही वर्षांत पर्यावरणपूरक उत्सव साजरा करण्याबाबत जनजागृती होत असल्याने नागरिक कापडी कंदिलांसह इतर पर्यावरणपूरक कंदिलांना प्राधान्य देत आहेत. त्यातच काही ग्राहक एकदा वापरता येईल असा कंदील खरेदी करत आहेत. त्यासाठी विविध प्रकारचे कंदील बाजारात दाखल झाले आहेत.

२० ते २५ वर्षांपूर्वी कागदापासून तयार केलेले आकाशकंदील मिळत असत. तेच आकाशकंदील बाजारपेठेत फेरफटका मारताना जास्त प्रमाणात दिसून येत आहेत. वेगवेगळ्या प्रकारचच्या आकाशकंदिलांचे ५० रुपयांपासून ते बाराशे रुपयांपर्यंत दर आहेत. त्याचबरोबर दारासमोर लावण्यासाठी लहान आकाश कंदिलांनाही ग्राहकांकडून मागणी असल्याचे विक्रेते सांगतात.

प्लास्टिकचे छोटे आकाश कंदील ६० रुपये डझन विकले जात आहेत. वेगवेगळे रंगीबेरंगी, प्लास्टिकच्या वापराने तयार करण्यात आलेले आकाशकंदीलही विक्रीसाठी आलेले आहेत. डेकोलाइट, स्केअर, लोटस, चांदणी, प्लॉअर, अनार करंजी, बलून या पद्धतीच्या आकारातील कंदिलांनी बाजारपेठ सजली आहे.



## प्रसाद साळवींना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

**। कोलाड । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद केंद्रशाळा पुगाव येथे कार्यरत असणारे प्राथमिक शिक्षक प्रसाद यशवंत साळवी यांना यावर्षीचा सन २०२५ सालचा रायगड जिल्हा परिषदेचा जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार मान्यवरांच्या उपस्थितीत आरसीएफ हॉल, अलिबाग येथे पुरस्कार वितरण सोहळ्यामध्ये प्रदान करण्यात आला.

याबद्दल प्रसाद साळवी यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. त्यांनी केलेल्या शैक्षणिक, सामाजिक, सर्वांगीण कामाची पोहोचपावती त्यांना या पुरस्काराच्या निमित्ताने मिळालेली आहे. प्रसाद साळवी सरांनी आपल्या या पुरस्काराचे श्रेय आई, वडील, पत्नी, बहीण, गुरुजन वर्ग, विद्यार्थी, पालक, जिल्हा व तालुका शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक समिती, पुगाव केंद्र, समाज, शिक्षक मित्रपरिवार यांना दिलं आहे.

रोहा तालुक्याच्या गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, जिल्हा व तालुक्यातील पदाधिकारी व अधिकारी, सर्वच क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर मंडळींकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



## शैक्षणिक साहित्याचे वाटप

**। खांब । प्रतिनिधी ।**

अनिकेत तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त रोहा तालुक्यातील प्रा. शळा किल्ला येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. रोटरी क्लब ऑफ रोहा व सुनील तटकरे युवा प्रतिष्ठान किल्ला यांच्या सहयोगाने व डॉ. विरेंद्र एन. यांच्या माध्यमातून शालेय साहित्य ठेवण्यासाठी दोन मोठी कपाटं, तसेच ग्रा.पं.सदस्य नरेश चांदोरकर यांच्या माध्यमातून विविध प्रकारचे शैक्षणिक साहित्याचे वाटप येथील विद्यार्थ्यांना करण्यात आले.

यावेळी रोटरी क्लब रोहा अध्यक्ष राजू पोकळे, सरचिटणीस जयदेव पवार, राष्ट्रवादी युवक अध्यक्ष जयवंत मुंढे, महेश बामुगडे, रूपेश बामुगडे, चंद्रकांत बामुगडे, सतीश महाडिक, मुख्याध्यापक चंद्रकांत वरखले, आशिष शहा, रमेश डोईफोडे यांच्यासह रोटरी क्लबचे सर्व पदाधिकारी व सदस्य तसेच किल्ला व अशोक नगर ग्रामस्थ उपस्थित होते.

# दिघी येथे पोषण महिना उत्साहात

### अदानी फाऊंडेशन आणि एकात्मिक बालविकास प्रकल्पाचा स्तुत्य उपक्रम

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

अदानी फाऊंडेशन दिघी पोर्ट लिमिटेड आणि एकात्मिक बालविकास सेवायोजन प्रकल्प (श्रीवर्धन) यांच्या संयुक्त विद्यमाने दिघी ग्रामपंचायतीच्या सभागृहात सरपंच विपुल गोरीवले यांच्या अध्यक्षतेखाली पोषण महिना निमित्ताने कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमांतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये पोषण आहार (थाळी) स्पर्धा, ओटी भरणी कार्यक्रम, बेबी केअर किट वाटप, अन्न प्राशन कार्यक्रम घेण्यात आले.



या उपक्रमाचा उद्देश ग्रामीण भागातील महिला, बालक आणि कुटुंबांमध्ये संतुलित व पौष्टिक आहाराचे महत्त्व पटवून देणे हा होता. महिलांनी उत्साहाने पोषण थाळी स्पर्धेत सहभाग घेतला, विविध पालेभाज्या, कडधान्ये, भरडधान्ये आणि दुग्धजन्य पदार्थ वापरून आरोग्यदायी थाळ्या सादर केल्या. यावेळी पोषण आहार थाळी स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सरपंच विपुल गोरीवले, उपसरपंच गोपाळ मेदाडकर, सदस्या निर्मला कांदेकर, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष विकी मेंदडकर, एकात्मिक बालविकास सेवायोजन प्रकल्प श्रीवर्धन अधिकारी अमिषा भायदे, अदानी फाऊंडेशन अधिकारी अवधूत पाटील तसेच सर्व आणि अंगणवाडी सेविका, ग्रामस्थ, महिला, अंगणवाडी कार्यकर्त्या आणि बालके उपस्थित होती.

पोषण आहार कार्यक्रम, अंगणवाडीमार्फत मिळणाऱ्या विविध लाभांची माहिती अधिकारी अमिषा भायदे यांनी दिली, तर अदानी फाऊंडेशन दिघी पोर्ट लिमिटेड अंतर्गत राबविल्या जाणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती अवधूत पाटील यांनी उपस्थितांना दिली. सूत्रसंचालन अमृता पिळणकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रामसखी नम्रता दिघीकर व अरुंधती पिळणकर, सर्व अंगणवाडी सेविका आणि ग्रामपंचायत दिघी यांनी परिश्रम घेतले.

### तयार किल्ल्यांनाही मुलांकडून मोठी पसंती | मावळ्यांची प्रतिकृती खरेदीसाठी गर्दी

# दिवाळीनिमित्त किल्ले बांधण्यात रमली बच्चेकंपनी

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

दिवाळी व किल्ल्यांची मोठी परंपरा महाराष्ट्रामध्ये आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर लहानगे, प्रौढ माणसे किल्ल्यांच्या प्रतिकृती आपल्या घरासमोर, सोसायटीच्या आवारात व सार्वजनिक ठिकाणी तयार करतात.

रायगड जिल्ह्यात किल्ल्यांची असलेली पार्श्वभूमी यामुळे दिवाळीतील किल्ले बांधणीला आगळेवेगळे महत्त्व आहे. दिवाळीनिमित्त बाजारपेठेतही तयार किल्ल्यांच्या प्रतिकृती विकण्यासाठी उपलब्ध झाल्या असून, विविध आकार, प्रकार यामध्ये या प्रतिकृती दिसून येत आहेत.



(छायाचित्र : सलीम शेख)

प्रथम सत्र परीक्षा संपत असून, दिवाळीनिमित्त बच्चेकंपनी किल्ले बांधण्यात रंगली असल्याचे दिसून येत आहेत. ज्येष्ठांचीही त्यांना मदत होत आहे. छत्रपती शिवाजी महाराज प्रतिकृती, सिंहासन, रांगोळी, गवत, मावळे, सैनिक, प्राणी यांना बाजारपेठेत चांगली मागणी असून, किल्ल्यांच्या प्रतिकृतीसाठी यांचीही मोठ्या प्रमाणात खरेदी केली जाते आहे. यावर्षी मोठ्या प्रमाणात दिवाळीचा उत्साह दिसून येत असून, बच्चेकंपनी किल्ले बांधण्यात व्यस्त असल्याने पालकांनीही समाधान व्यक्त केले आहे.

> दिवाळीनिमित्त दरवर्षी शाळेच्या व पालकांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही किल्ले बांधतो. यावर्षी आम्ही मित्रांच्या मदतीने सुंदर अशी प्रतिकृती तयार करत आहोत. मातीचा किल्ला बांधण्यात काही वेगळाच आनंद असतो तो आम्हाला मिळत आहे.
> – नीरज सुतार, विद्यार्थी

> दिवाळीच्या पार्श्वभूमीवर किल्ले बांधणी करून ऐतिहासिक परंपरा जतन केली जाते.यातून कील्यांची माहिती मिळत असते व निर्मितीचा आनंद मिळतो.यावर्षी पुन्हा लहानगे किल्ले बनविण्यात व्यस्त असल्याने समाधान वाटत आहे.
> – श्रीकृष्ण गरधे, शिक्षक

## अंगणवाडी सेविका, सुपरवायझरना टॅबचे वितरण

**। खांब । प्रतिनिधी ।**

गतवर्षापासून रोहा तालुक्यामध्ये अंगणवाडीमध्ये क्रेस्ट व महानगर गॅस यांच्या संयुक्त विद्यमाने रोहा तालुक्यात पालवी प्रकल्प सुरू आहे. या प्रकल्पांतर्गत रोहा तालुक्यातील २१ मॉडेल अंगणवाडी सेविकां व सीडीपीडी तसेच सुपरवायझर यांना एमजीएल विद्या पालवी प्रकल्पामार्फत टॅब वितरणाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला.



अंगणवाडीपासून दिले जाणारे शिक्षण अधिक दर्जेदार असावे व बालवयापासूनच बालकांच्या बुद्धीमत्तेला चालना मिळावी तसेच त्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा या उद्देशाने क्रेस्ट व महानगर गॅस यांच्या संयुक्त विद्यमाने रोहा तालुक्यात पालवी प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून अंगणवाडी शिक्षणासाठी विविध प्रकारचे कार्यक्रम हाती घेण्यात आले आहेत. त्याच कार्यक्रमाचा एक भाग म्हणून तालुक्यातील मॉडेल अंगणवाडी सेविकांचे चौथ्या स्तराचे प्रशिक्षण व टॅब वितरण सोहळ्याचे आयोजन दि.१४ व १५ ऑक्टो. रोजी करण्यात आले होते. यामध्ये १५ तारखेला रोहा तालुक्यातील २१ मॉडेल अंगणवाडी सेविकांना व सीडीपीडी व सुपरवायझर यांना एमजीएल विद्या पालवी प्रकल्पामार्फत टॅब वितरण करण्यात आले.

या टॅबचा उपयोग या मॉडेल अंगणवाडी सेविका त्यांच्या बीटमध्ये प्रशिक्षण देताना, पालकांच्या व्हिडिओवर व इतर सेविकांना कामात मदत करण्यासाठी करणार आहेत. हे टॅब दिल्यामुळे सेविकांमध्ये आनंद व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.टॅबवितरणासाठीकार्यक्रमप्रसंगी तालुक्याच्या महिला व बालविकास अधिकारी शरयू शिंदे, पर्यवेक्षिका सुप्रिया भगत, भरती भाकरे, कल्पना नांदेकर, करिष्मा खाडे तसेच पालवी रोहा प्रकल्पाचे व्यवस्थापक नितीन मराडे, प्रकल्प प्रमुख भूषण पटारे हे उपस्थित होते. सोबतच पालवी प्रकल्पातील सर्व प्रकल्प समन्वयक व मॉडेल अंगणवाडी सेविकादेखील उपस्थित होत्या.




## राशीभविष्य

- **मेष :** स्थापत्य, क्रीडा क्षेत्रात अनुकूलता राहील. परदेश प्रवासाचे बेत ठरतील. स्पर्धांमध्ये यश मिळू शकेल.
- **वृषभ :** व्यवसायात अडचणी येतील. नोकरीत सहकाऱ्यांची साथ लाभेल. स्थावर प्रश्न आहे तसे राहतील.
- **मिथुन :** कौटुंबिक स्वास्थ लाभेल. जोडीदाराच्या प्रकृतीकडे लक्ष द्या. नव्या ओळखीतून उत्तम लाभ होईल.
- **कर्क :** व्यवसायात नव्या संधी लाभतील. उष्णतेच्या विकाराबाबत काळजी घ्या. अपत्याची चिंता भेडसावेल.
- **सिंह :** आर्थिक स्थिती उत्तम राहील. आपापल्या क्षेत्रात प्रगतीला वाव राहील. ताण–तणावातून बाहेर याल.
- **कन्या :** मनातील योजना आकाराला येतील. कायदेशीर बाबतीत काळजी घ्यावी. अनावश्यक ताण राहील.
- **तूळ :** अडचणींवर मात करू शकाल. खरेदीचे व्यवहार लाभदायक ठरतील. प्रवासात पुरेशी काळजी घ्यावी.
- **वृश्चिक :** दिवसाची सुरूवात उत्तम होईल. आत्मविश्वास वाढीस लागेल. कलाकारांना मानसन्मान लाभेल.
- **धनु :** हितशत्रूंच्या कारवायांवर मात कराल. यांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील. प्रवासाचे बेत पुढे ढकलावे.
- **मकर :** मनाविरूध्द घटना संभवतात. भावंडांशी मतभेद टाळायला हवेत. स्वमताग्रह हिताचा ठरणार नाही.
- **कुंभ :** आर्थिक बाबतीत ताण राहील. घरगुती व्यवसायात उलाढाल वाढेल. ज्येष्ठांचं मार्गदर्शन कामी येईल.
- **मीन :** दिलासादायक घटना घडतील. अनुभवींचा सल्ला कामी येईल. स्वकर्तृत्त्वावर विश्वास ठेवायला हवा.

मनातलं ओठांवर

## रमा एकादशी

दिवाळीच्या एक दिवस आधी येणारी ही रमा एकादशी ही अत्यंत शुभ, धन, समृद्धी आणि वैभवदायक मानली जाते. रमा एकादशीला श्रीकृष्णाचे पूजन करतात. पौराणिक कथेनुसार, हजारो वर्षांपूर्वी मुचुकुंद नावाचा एक राजा होता. तो विष्णूचा मोठा भक्त होता. या राजाच्या कन्येचं नाव चंद्रभागा होतं. तिचा विवाह राजा चंद्रसेनचा पुत्र शोभन याच्याशी झाला होता. योगायोगाने एकदा शोभन राजकुमार एकादशीच्या तिथीवर आपल्या सासरी आला होता. त्या दिवशी त्याने एकादशीचे व्रत करण्याचा निर्णय घेतला. मात्र चंद्रभागा शोभन कसे उपाशी काय राहतील या चिंतेने व्याकुळ झाली होती. परंतु, राजा मुचुकुंदच्या सक्तीमुळे ती शांत बसली. परंतु भुकेने व्याकूळ झालेल्या राजकुमार शोभनचा मृत्यू झाला. चंद्रभागेच्या भक्तीमुळे विष्णूने त्याला पुन्हा जीवनदान दिलं. तसंच त्याला मंदराचल पर्वतावरील राज्यही दिलं. तेथे तो आपल्या पत्नीसह आनंदाने राहू लागला. तेव्हापासून या एकादशीच्या व्रताला मोठं महत्त्व प्राप्त झालं. वारकरी संप्रदयातील लोक आजही एकादशीचे व्रत नियमाने पाळतात.

दिनविशेष

## १७ ऑक्टोबर

- १९७० : भारतीय क्रिकेटपटू अनिल कुंबळेचा जन्म.
- १९९६ : अभिनेते डॉ. श्रीराम लागू यांना कालिदास सन्मान जाहीर.
- २००३ : भारतात तृतीयपंथीयांनी 'जिती जितायी पॉलिटिक्स' हा राजकीय पक्ष सुरु केला.
- २०१३ : आरुषी आणि हेमराजच्या खुनासाठी राजेश आणि नूपुर तलवार यांनी चाकूचा वापर केल्याचं सीबीआयने युक्तिवादात सांगितलं.

महत्त्वपूर्ण काही...

## कस लावताना...

पृथ्वीचा गाभारा अनेक मौल्यवान घटकांनी समृद्ध आहे. पृथ्वीवर काही ठिकाणी लोह, कुठे निकेल तर कुठे तांब्याचे साठे आढळतात. पण मोठ्या प्रमाणावरील उत्पादनासाठी खनिज पदार्थ गोळा केले जातात तेव्हा एखाद्या धातूचं त्यातील प्रमाण व्यवहार्य मर्यादेच्या आसपास आहे वा नाही हे बघितलं जातं. या साठ्यांमधून एक टनामागे किती धातू निर्माण होईल यासाठी काय खर्च होईल आणि तो त्या धातूच्या विक्रीतून वसूल होईल वा नाही याचा ठोकताळा मांडतात. जगात ज्ञात असे फार मोठे खनिजसाठे आहेत पण तेथील उत्पादन व्यवहार्य नसल्यामुळे अजून ते वापरात नाहीत. याच धर्तीवर सैबेरिया आणि अंटार्क्टिकाच्या बर्फाळ प्रदेशात मोठे साठे असले तरी त्यांचा वापर व्यवहार्य नाही. मूळ अवस्थेत खनिजं वेगळीच वाटतात. मातकट, काळपट, कंगोरे असणारी खनिजे ओळखण्यासाठी कस लावला जातो. कस बघताना काठिण्याचाही अंदाज येतो. सर्वात मऊ खनिजे म्हणजे टाल्क तर सर्वात कठिण हिरा. या दोन टोकांमधील दहा टप्प्यात अन्य खनिजे विभागण्याची पद्धत आहे.

### पंचांग

**शुक्रवार, १७ ऑक्टोबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, अश्विन कृष्ण ११, चंद्रराशी : सिंह, योग : शुक्ल, नक्षत्र : मघा, सूर्योदय ६.३५ सूर्यास्त ६.१२

### फॉरवर्डस

**हर राज क़ा एक़ वक़्त होता हैं साहब...**

**वक़्त से पहलें कहां सच भीं ज़हर बनता हैं...!**

आरोग्यमंत्र

## पचनकार्य सुधारण्यासाठी...

अनेक ज्येष्ठांना अपचनाचा त्रास सतावत असतो. अशावेळी त्यांनी आपल्या अहराकडे लक्ष द्यायला हवं. चेरी, द्राक्षं, बदाम अशा फायबरयुक्त पदार्थांचा आहारात समावेश असावा. त्यामुळे अन्नाचं पचन चांगलं होतं. दररोज दुपारी एक वाटी दही आहारात असावं. दह्यामध्ये प्रोबायोटिक्स असतात. ते पचनव्यवस्था सुधारतात. ज्या लोकांना मांसाहार जास्त आवडतो अशा लोकांनी कमी चरबी असलेले मांस खायला हवे. कारण मांस पचायला वेळ लागतो.

आलं, काळे मिरे, सैंधव मीठ आणि धणे या मसाल्यांचा जेवणात समावेश असायला हवा. हे मसाले जेवणाचा स्वादच वाढवत नाहीत तर पचनकार्यही सुधारतात. व्हिटॅमिन–सी असलेले ब्रोकोली, टोमॅटो, किवी, स्ट्रॉबेरी खावेत. रंगीत फळं, भाज्या भरपूर साऱ्या खाव्यात. त्यामुळे पोट साफ होते आणि अपचनाचा त्रास होत नाही. सकाळी उठल्यावर व्यायाम आणि पोटाला मालीश केल्यास पचनशक्ती वाढते. काही चांगल्या तेलांनी पोटाची मालीश करावी. सकाळी गरम पाणी प्यायला आवडत नसेल तर कोमट पाण्यात लिंबाचा रस घालून प्यावा म्हणजे पोटातलं ॲसिड कमी होऊन पोट साफ राहील. भूकेपेक्षा थोडे कमी खावं त्यामुळे पचन व्यवस्थितपणे व्हायला मदतच होईल. तुम्ही कोणत्या प्रकारे खाता, कशा प्रकारे खाता यावरही पचन कार्य अवलंबून असतं. जेवायला मांडी घालून म्हणजे सुखासनात (भारतीय बैठक) बसावे. प्रत्येक घास बत्तीस वेळा चावला गेला पाहिजे. शांतपणे, समाधानाने, जेवणाचा आनंद घेत जेवले तर पचनही चांगलं होतं.

### फॅशन पॅशन

पावसाळा संपून आता ऑक्टोबर हीटला सुरूवात झाली आहे. घामाच्या धारा लागत आहेत. थंडीला थोडा वेळ आहे. त्यामुळे पेहरावात थोडा बदल करावा लागणार आहे. उन्हाळ्यातले आरामदायी कपडे बाहेर काढावे लागणार आहेत. बाहेर प्रचंड ऊ न असताना आपण नेमकं काय घालायचं याविषयी...

✻ ऑफिसला जाण्यासाठी कॉटन किंवा लिननच्या सूटचा वापर करा. त्वचेला थोडा मोकळा श्वास घेऊ द्या. कॉटन तसंच लिननचे कपडे हलके असतात. यामुळे उकाड्यात तुम्हाला बरं वाटेल. **(क्रमश:)**

करिअरवाटा

## तणावग्रस्तता नको

तणावग्रस्त अवस्था असेल तर मुलाखत अयशस्वी होण्याची शक्यता असते. हे लक्षात घेता मुलाखतीची तयारी करताना कोणताही ताण निर्माण होणार नाही याची काळजी घ्यायला हवी. प्रत्येक क्षेत्रासाठी मुलाखतीचं तंत्र वेगळं असतं. म्हणून त्या त्या क्षेत्रात मुलाखतीसाठी कोणत्या तंत्राचा वापर केला जातो याचा अभ्यास करून मुलाखतीला सामोरं जाणं योग्य ठरतं. साधारणपणे मुलाखतीत उमेदवाराच्या बौध्दिक, मानसिक क्षमता तसंच आचार–विचारांबाबत जाणून घेतलं जातं. परंतु अलीकडे शारीरिक क्षमता आणि नेतृत्त्वगुणही पाहिले जातात. त्यामुळे वेगवेगळ्या अंगांनी मुलाखतीची तयारी करायला हवी.



मुलाखतीच्या वेळी संबंधित पदासाठी आवश्यक व्यावसायिक अर्हता माहीत असणं गरजेचं आहे. त्या व्यवसायाबाबत आधुनिक आणि नव्या तंत्रज्ञानाची जाण असणंही आवश्यक ठरतं. मुलाखतीमध्ये प्रश्नोत्तरं तसंच संभाषणाचा समावेश असतो. त्यामुळे त्या त्या भाषेवर उमेदवाराचं प्रभुत्व असायला हवं. बोलणं स्पष्ट आणि मुद्देसूद असायला हवं. उत्तम संभाषणकला मुलाखत घेणाऱ्यांवर छाप पाडते. मुलाखतीत सगळ्यात महत्त्वाचा ठरतो तो तुमचा आत्मविश्वास. तो चालण्यातून, उभं राहण्याच्या, बसण्याच्या पध्दतीतूनही व्यक्त व्हावा.

खेचाखेची

## नक्की ठरवा

ट्रेनमध्ये बसलेल्या आजी छोट्या नातवाला सारखं सांगत होत्या, खा लवकर लवकर , नाहीतर मी हा गाजरहलवा समोरच्या काकांना देऊन टाकीन.

शेवटी समोर बसलेले जोशी काका वैतागून म्हणाले,
अहो आजी काय करायचं ते लवकर ठरवा, तुमच्या गाजरहलव्याच्या नादात मी चार स्टेशन्स पुढे आलोय......!!

### वेगळं काही

पश्चिम बंगालमधल्या कालिम्पोंगमध्णये मॉर्गन हाऊस आहे. इथे जॉर्ज मॉर्गन आपल्या पत्नीसोबत राहात. पत्नीच्या निधनानंतर त्यांनी हे ठिकाण सोडलं. मग या बंगल्याचं रूपांतर लॉजमध्ये करण्यात आलं. पण इथे एका स्त्रीच्या चपलांचा आवाज ऐकल्याचा दावा काहींनी केला आहे. हैदराबादमध्ये रामोजी फिल्मसिटीची निर्मिती निजामांच्या युद्धक्षेत्रावर झाली आहे. रामोजी फिल्मसिटीत असलेल्या हॉटेलांमध्ये चित्रविचित्र घटना घडत असल्याचं काहींचं म्हणणं आहे. राजस्थानातल्या कोटामध्ये ब्रिजराज भवन येथे चार्ल्स बर्टन नावाचा ब्रिटिश अधिकारी राहात असे. १८५७ च्या उठावादरम्यान बर्टन आणि त्याच्या कुटुंबाची हत्या करण्यात आली होती. या स्थानाचं रूपांतर हॉटेलमध्ये करण्यात आलं. इथे बर्टनची आत्मा येत असल्याचं बोललं जातं.

सौंदर्यसाधना

## खोट्या पापण्या वापरताय?

मेक अप करताना डोळ्यांसाठी विशेष सोपस्कार पार पाडावे लागतात. मस्कारा, लायनर, आयशॅडो अशा बऱ्याच प्रसाधनांबरोबरच फेक आयलॅश म्हणजे खोट्या पापण्यांचा वापर करुनही डोळ्यांचं सौंदर्य खुलवलं जातं. पण अनेकींना खोट्या पापण्यांची निवड कशी करायची, पापण्या कशा लावायच्या हे माहीत नसतं. ही समस्या दूर करण्यासाठी खोट्या पापण्या लावण्याचं तंत्र आपण जाणून घेऊया.



✻ खोट्या पापण्या लावण्याआधी डोळ्यांचा मेक अप करून घ्या. मेक अप केल्यानंतर चिकटवल्याने पापण्या नीट चिकटतात. ✻ डोळ्यांच्या आकारानुसार खोट्या पापण्यांची निवड करावी. या पापण्या फार मोठ्या किंवा छोट्या असू नयेत. आकार जास्त मोठा असेल तर या पापण्या कात्रीने कापून घ्याव्यात. ✻ आधी खोट्या पापण्यांच्या कडेला गम लावून घ्या. त्यानंतर त्या डोळ्यांवर चिकटवा. खोट्या पापण्या खऱ्या पापण्यांच्या वरच्या बाजूने लावायला हव्यात. पातळ ब्रशचा वापर करून पापण्या सेट करा. थोडा दाब दिला तर पापण्या नीट बसतील आणि नॅचरल लूक मिळेल.

## सुडोकू १७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | | | ६ | | | | | |
| | | ९ | ३ | ५ | | ८ | २ | |
| ७ | | | | | | १ | ६ | |
| ६ | | | | | ४ | | ७ | |
| ३ | | | | ६ | | | | ५ |
| | ८ | | ७ | | | | | २ |
| | ७ | १ | | | | | | ६ |
| | ५ | ६ | | ४ | ३ | ९ | | |
| | | | | | ६ | | | १ |

टीप -
✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १६ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ३ | १ | ५ | ८ | ९ | ४ | ७ | ६ |
| ८ | ६ | ७ | ४ | २ | ३ | १ | ५ | ९ |
| ४ | ९ | ५ | १ | ६ | ७ | ३ | ८ | २ |
| ९ | ४ | ३ | ८ | १ | ६ | ५ | २ | ७ |
| ६ | १ | २ | ७ | ३ | ५ | ८ | ९ | ४ |
| ७ | ५ | ८ | ९ | ४ | २ | ६ | ३ | १ |
| १ | २ | ६ | ३ | ९ | ८ | ७ | ४ | ५ |
| ३ | ७ | ४ | २ | ५ | १ | ९ | ६ | ८ |
| ५ | ८ | ९ | ६ | ७ | ४ | २ | १ | ३ |

## शब्दकोडे क्रमांक १७



**आडवे शब्द :–**
१) अत्यंत संथ गतीने
६) खून, हत्या
८) शपथ
११) धाड घालणे, लुटणे
१३) आशीर्वादाचा हात
१४) बळकट
१६) उत्सवाचे दिवस
१७) अंत:करण
१८) खोलवर
१९) सदोदित
२१) हद्द
२२) पहारेकरी
२५) बांबू
२६) संपूर्ण
२८) नदीचे तीर
२९) बनकर
३०) कमी बोलणारा
३२) दिवा
३३) पाण्यावरील लाट
३५) गैरसावध
३७) विरी, शक्ती सामर्थ्य
३८) एकटा, खच सिंचन
४०) गव्हाचे पीठ
४१) कैफ मद
४२) एक ऋतू
४३) मोठे डोळे, विद्रूप
४६) पायाचे उभे हाड
४८) एक कडवे धान्य
४९) समुद्रकिनारा
५२) बळ, शक्ती
५४) माळ धारण करणारा
५६) खसखस लावलेला एक गोड पदार्थ
५९) बोबडी वळाल्या नंतरची भाषा
६१) ऋण
६२) च्या बरोबर
६३) श्रम
६४) ओटा, पार
६५) उथळ वाटी
६६) मीन
६८) विरोध, अडथळा
७०) रमापती
७३) तामसी रागीट
७५) वाळवी
७६) दृष्टी
७७) डबके, तट्ट फुगलेला

**उभे शब्द :–**
२) संस्कृत भाषा
३) बदल
४) लोभी
५) बळ, दम, भार
६) हिरव्या विषारी सापाची जात
७) साहित्यातील नऊ भावना
८) पाऊल
९) सोशीक, सोसण्याचा स्वभाव
१०) झकास
१२) महिना
१४) श्रीरामाचे वडील
१५) कट्टर, ठाम मताचा
१८) नेहमी
२०) रामदासस्वामींचा एक ग्रंथ
२३) गोंधळ, मोठा आवाज
२४) शरम
२५) उमलण्यापूर्वीची फुलाची अवस्था
२७) मनाचा ओढा
२९) मागणारा
३०) वजनदार
३१) हाताचा तळवा
३४) गरीब, निर्धन
३६) वस्तू, माल ३७) विसंगती,
३८) साईबाबांचा एक संदेश
३९) छोटा दरवाजा
४४) भरभराट
४५) त्या प्रमाणे
४७) लो टिळकांनी लिहिलेला एक टीका ग्रंथ
५०) बेपता, ठावठिकाणा न लागेल असे
५१) तात्काळ
५३) अरुंद तोंडाची लांब पिशवी
५५) यथाशास्त्र, पद्धतीनुसार
५७) धमनी
५८) आठ
६०) लवकर, चटकन
६३) जनावरांचा घोळका
६७) एक चतुर्थांश भाग
६८) शंकर, प्रत्येक
६९) दालचीनीचे झाड
७१) शोध, तपास
७२) रडकथा
७३) चांदणी
७४) एकाग्र नजर

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# निवडक

## पार्थची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड



**श्रीवर्धन :** शहरातील डॉ. परेश तोडकर यांचा मुलगा पार्थ तोडकर याची फायर आर्म रायफल शूटिंगसाठी राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. मध्य प्रदेश भोपाळ येथे ३४ व्या ऑल इंडिया जी. व्ही. मावळणकर शूटिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत पार्थ याची निवड करण्यात आली. पार्थ इयत्ता ७ वी मध्ये शिकत असून त्याला लहानपणापासून या खेळाची आवड आहे. परंतु तालुक्यात तसेच जवळपास कुठेही ट्रेनींग घेण्याची सुविधा नाही किंवा मार्गदर्शक देखील मिळाला नाही. मुलाची आवड व तीव्र ईच्छा पाहता डॉक्टर दाम्पत्यांनी त्याला रत्नागिरी येथील पुष्कराज इंगवले व राजेश्वरी इंगवले यांच्या मार्गर्शनाखाली शाळेला सुट्टी असेल त्या दरम्यान ठेवले. अल्पवाधितच त्याला या खेळात यश प्राप्त झाले आहे. भविष्यात त्याला देशकडून खेळण्याचं त्याच स्वप्न आहे.

## नेपाळची ऐतिहासिक कामगिरी

**नवी दिल्ली :** नेपाळ क्रिकेट संघाने रोहित पौडेल याच्या नेतृत्वात आगामी टी २० वर्ल्ड कप २०२६ स्पर्धेचे तिकीट मिळवले आहे. नेपाळ टी २० वर्ल्ड कप स्पर्धेसाठी पात्र ठरणारी १९ वी टीम ठरली आहे. तसेच नेपाळ व्यतिरिक्त ओमान क्रिकेट संघानेही क्वालिफाय केलं आहे. नेपाळ आणि ओमान या दोन्ही संघांची टी २० वर्ल्ड कप स्पर्धेत खेळण्याची दुसरी वेळ ठरणार आहे. आयसीसीने एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरुन याबाबतची माहिती दिली आहे. टी २० वर्ल्ड कप २०२६ स्पर्धेत एकूण २० संघ सहभागी होणार आहेत. या स्पर्धेत २० संघ खेळण्याची ही दुसरी वेळ ठरणार आहे. या स्पर्धेसाठी २० पैकी १७ संघ निश्चित झाले होते. तर उर्वरित ३ जागांसाठी ९ संघांमध्ये चुरस होती. आयसीसी टी २०ळ वर्ल्ड कप आशिया आणि ईएपी पात्रता फेरीतून ओमान आणि नेपाळने चमकदार कामगिरी करत स्पर्धेचे तिकीट मिळवले आहे.

## नीरजची पुन्हा निराशाजक कामगिरी



**नवी दिल्ली :** वर्ल्ड एथलेटिक्स चॅम्पियनशीप २०२५ स्पर्धेतील फायनलमध्ये भारताचा गोल्डन बॉय भालाफेकपटू नीरज चोप्रा याने निराशा केली आहे. ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक मिळवून देणाऱ्या नीरज चोप्रा याच्याकडून या स्पर्धेतून भारताला गोल्डची आशा होती. मात्र, नीरज भारतीयांच्या आशेवर खरा उतरू शकला नाही. नीरजला टॉप ६ मध्येही स्थान मिळवता आलं नाही. त्यामुळे नीरजचे आव्हान संपुष्टात आले. नीरजला जपानमध्ये आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेतील अंतिम फेरीत ८४.०३ मीटर लांब भाला फेकता आला. नीरजने पहिल्या प्रयत्नात ८३.६५ मीटर दूर भाला फेकला. मात्र त्यानंतर नीरजच्या कामगिरीत घसरण झाली. नीरज ५ पैकी २ थ्रोमध्ये अपयशी ठरला. नीरजचे २ थ्रो फाऊल ठरले. नीरजने पहिलाच थ्रोमध्ये ८३.६५ मीटर इतकं अंतर कापलं. नीरजने पहिल्या थ्रोच्या तुलनेत दुसरा थ्रो काही मीटरने लांब फेकला. नीरजने दुसऱ्या थ्रोमध्ये ८४.०३ मीटर इतका दूर भाला फेकला. नीरज तिसऱ्या प्रयत्नात अपयशी ठरला. नीरजचा तिसरा थ्रो फाऊल ठरला. नीरजच्या चौथ्या थ्रोमध्ये घट झाली. नीरजने चौथ्या प्रयत्नात भाला ८२.८६ मीटर दूर फेकला. तर पाचव्या प्रयत्नात नीरज अपयशी ठरला.

## गोवा संघाची एकाच डावात द्विशतकं

**मुंबई :** रणजी करंडक स्पर्धेत गोवा संघातून एकाच डावात दोन



द्विशतक झळकवली गेली. गोवा विरुद्ध चंडीगढ लढतीत गोवा संघाने ८ बाद ५५० धावांचा डोंगर उभा केला. अभिनव तेजराना आणि ललित यादव यांनी द्विशतकं झळकावली. पण, या संघाकडून खेळणारा अर्जुन तेंडुलकर फक्त १ धाव करून माघारी परतला. मंथन खुटकर व सूयश प्रभूदेसाई यांची ४५ धावांची भागीदारी विष्णूने तोडली. मंथन २१ धावांवर माघारी परतला. त्यानंतर सूयश ( ४७) व अभिनव ही जोडी मैदानावर उभी राहिली. या दोघांनी ९७ चेंडूंत ७० धावांची भागीदारी केली. कश्यप बाकळे भोपळ्यावर माघारी परतला. अभिनव व ललित यादव या जोडीने चौथ्या विकेटसाठी ५१० चेंडूंत ३०९ धावा जोडल्या. पबिहारी पोरगा पेटला, एकहाती भाव खाऊन गेला.अभिनव ३२० चेंडूंत २१ चौकार व ४ षटकारांसह २०५ धावांची खेळी केली. कर्णधार दीपराज गांवकर ४ धावांवर बाद झाला.

## प्रशासक नियुक्तीला स्थगिती

**मुंबई :** सुप्रीम कोर्टाने महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन प्रशासक नियुक्तीला स्थगिती दिली आहे. महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनवर प्रशासक नेमण्याच्या आदेशावर भारताच्या
सर्वोच्च न्यायालयाने स्टेटस को ठेवण्याचा आदेश दिला आहे. या आदेशानुसार, मुंबई उच्च न्यायालयाने नेमलेले प्रशासक सध्या कार्यभार स्वीकारू शकणार नाहीत. तसेच असोसिएशनची नवी निवडणूकही घेऊ शकणार नाहीत. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाविरोधात दाखल करण्यात आलेली स्पेशल लीव्ह पिटीशन सर्वोच्च न्यायालयात अधिवक्ता सोमिरन शर्मा आणि गणेश गाढे यांच्या माध्यमातून सादर करण्यात आली होती. दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने अंतरिम संरक्षण देत, आजच्या स्थितीनुसार स्थगिती लागू राहील, असा आदेश दिला. अद्याप प्रशासकांनी कार्यभार स्वीकारलेला नव्हता आणि सर्वोच्च न्यायालयाच्या या आदेशामुळे आता ते कार्यभार स्वीकारू शकणार नाहीत किंवा नवे निवडणूक प्रक्रिया सुरू करू शकणार नाहीत. त्यांनी स्पष्ट केले की, असोसिएशनच्या मागील निवडणुका राष्ट्रीय क्रीडा विकास संहिता नुसारच पार पडल्या असल्याने प्रशासक नेमण्याचे कोणतेही कारण नव्हते. या कायदेशीर प्रक्रियेत काहींनी सहकार्य न करता विरोध दर्शविला असला तरी, मंगळ पांडे, सुधाकर घाघ, मळोजी भोसले आणि नवनाथ यांच्या प्रयत्नांमुळे हे प्रकरण योग्य वेळी सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आले आणि प्रभावीपणे मांडण्यात आले.

# भारताला कॉमनवेल्थचे यजमानपद

■ अहमदाबाद शहराचा प्रस्ताव पुढे

■ ७२ देशांचे खेळाडू होणार सहभागी




**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था।**

कॉमनवेल्थ गेम्स अर्थात राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांच्या आयोजनासाठी आतापासूनच मोर्चेबांधणी सुरु झाली आहे. या स्पर्धेच्या कार्यकारी मंडळाने २०३० स्पर्धेच्या आयोजन कुठे करावे यासाठी चाचपणी सुरु केली आहे. असे असताना भारतातील अहमदाबादचे नावाचा प्रस्ताव पुढे आला आहे. या स्पर्धेच्या यजमानपदाच्या शर्यतीत भारताने नायजेरियाला मागे टाकले आहे. आता हा प्रस्ताव कॉमनवेल्थ क्रीडा स्पर्धेच्या सदस्यांपुढे ठेवला जाईल. या प्रस्तावावर २६ नोव्हेंबर २०२५ रोजी ग्लासगो येथे मोहोर लागण्याची शक्यता आहे. या बैठकीत अंतिम मंजुरी दिली जाईल.भारताला हा मान मिळाला तर ७२ देशांचे आदरातिथ्य करण्याची संधी मिळेल. या स्पर्धेत ७२ देशांचे खेळाडू सहभागी होण्याची अपेक्षा आहे. जर भारताच्या प्रस्तावावर मोहोर लागली तर आयोजनाची दुसऱ्यांदा संधी मिळणार आहे. यापूर्वी २०१० मध्ये या स्पर्धेचे आयोजन करण्यात आलं होतं.

कॉमनवेल्थ गेम्स मूल्यांकन समितीने सविस्तर आकलन करून हा प्रस्ताव पुढे ठेवला. सर्व प्रक्रियेचे पालन केल्यानंतर अहमदाबादची शिफारस करण्यात आली आहे. तांत्रिक बाबी, खेळाडूंचा अनुभव, पायाभूत सुविधा, प्रशासन आणि कॉमनवेल्थ गेम्सची मूल्ये लक्षात घेऊन हा प्रस्ताव पुढे पाठवला आहे. अहमदाबादकडे क्रीडाक्षेत्रातील जागतिक दर्जाच्या सुविधा आणि आधुनिक सुविधांचे शहर म्हणून पाहीले जात आहे. क्रिकेटचे सर्वात मोठे स्टेडियमदेखील अहमदाबादमध्ये आहे. यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत २०३० च्या कॉमनवेल्थ स्पर्धेसाठी बोली लावण्याच्या युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली होती.

२०३० कॉमनवेल्थ स्पर्धा खूपच महत्त्वाची आहे. कारण राष्ट्रकुल खेळ चळवळीच्या १००वा वर्धापन दिन असणार आहे. पहिला कॉमनवेल्थ स्पर्धेचे आयोजन १९३० मध्ये कॅनडातील हॅमिल्टन येथे करण्यात आलं होतं. त्यानंतर दर चार वर्षांनी या स्पर्धेचं आयोजन करण्यात येते. सध्या २०२६ मध्ये ग्लासगोत या स्पर्धेच्या आयोजनाची तयारी करण्यात येत आहे. २०२२ मध्ये बर्मिंगहॅममध्ये ही स्पर्धा पार पडली होती. तेव्हा भारताने पदक तालिकेत चौथं स्थान पटकावले होते. त्यामुळे पुढच्या वर्षी होणाऱ्या स्पर्धेतही अपेक्षा वाढल्या आहेत. या स्पर्धेच्या आयोजनामुळे देशातील लाखो तरुणांना व्यावसायिकरित्या खेळ खेळण्यासाठी प्रेरणा मिळू शकते.

## ज्ञान विकासचे खो-खो स्पर्धेत यश

**। पनवेल । वार्ताहर ।**

रा. फ. नाईक विद्यालयात १५ व १६ ऑक्टोबर रोजी झालेल्या जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेत ज्ञान विकास विद्यालयाने उत्कृष्ट कामगिरी करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. विद्यालयातील १४ वर्षाखालील मुले व मुली या दोन्ही संघांनी प्रथम क्रमांक, तसेच १९ वर्षाखालील मुलींच्या संघानेही प्रथम क्रमांक पटकावला असून, या तिन्ही संघांची निवड विभागीय पातळीवरील स्पर्धेसाठी झाली आहे.

याशिवाय १७ वर्षाखालील मुलांच्या संघाने द्वितीय क्रमांक मिळवून विद्यालयाचा झेंडा आणखी उंचावला आहे. या उत्कृष्ट कामगिरीसाठी सर्व खेळाडू, प्रशिक्षक, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष, पदाधिकारी, संचालक मंडळ, प्रशासकीय अधिकारी, मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, क्रीडाशिक्षक, शिक्षक व पालक यांचे मनःपूर्वक अभिनंदन संघांना आगामी विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## विलियम्सन दिसणार नव्या भूमिकेत

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

इंडियन प्रीमियर लीग २०२६ साठीचा मिनी ऑक्शन यावर्षी १३ ते १५ डिसेंबर दरम्यान होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. त्यामुळे सर्व संघाना १५ नोव्हेंबरपर्यंत कोणते खेळाडू, कोणाला रिलीज करायचे याची यादी देणे बंधनकारक आहे. न्यूझीलंडचा माजी कर्णधार केन विलियम्सन २०२६ मध्ये पुन्हा दिसून येणार आहे. पण खेळाडू म्हणून नव्हे तर नव्या भूमिकेत दिसणार आहे. तर लखनऊ सुपर जायंट्सने स्ट्रॅटेजिक ॲडव्हायझर म्हणून नियुक्त केले आहे. संघाचे माजी मेंटॉर जहीर खान यांनी पद सोडल्यानंतर ही जागा रिक्त होती आणि केनच्या येण्याने संघाला मोठा फायदा होऊ शकतो. केनला संघामध्ये आणण्याचा निर्णय हा संजीव गोयनका यांनी घेतला. गोयनकांनी लंडनमध्ये विलियम्सनची भेट घेऊन या निर्णयावर शिक्कामोर्तब केले आहे.

## तन्वी, उन्नती, रक्षिताची विजयी वाटचाल

**। गुवाहाटी । प्रतिनिधी ।**



भारतीय खेळाडूंची विजयी वाटचाल बुधवारीही कायम राहिली. तन्वी शर्मा, उन्नती हुडा, रक्षिता श्री रामराज या खेळाडूंनी मुलींच्या एकेरीत प्रतिस्पर्धी खेळाडूंवर विजय मिळवत बीडब्ल्यूएफ जागतिक ज्युनियर अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धेमध्ये उपउपांत्यपूर्व फेरीत मजल मारली आणि पदक पटकावण्याच्या दिशेने वाटचाल केली. अव्वल मानांकित तन्वी शर्मा हिने इंडोनेशियाच्या ओय विनार्तो हिच्यावर सहज विजय नोंदवला. आठवी मानांकित उन्नती हुडा हिने अमेरिकेच्या एलिस वांग हिला नमवले. दहावी मानांकित रक्षिता श्री रामराज हिने सिंगापूरच्या आलिया झकारिया हिचे कडवे आव्हान परतवून लावले. मुलांच्या एकेरीत निराशामुलींच्या एकेरीमध्ये भारतीय खेळाडूंनी दमदार कामगिरी केली असली तरी मुलांच्या एकेरीमध्ये भारतीय खेळाडूंकडून निराशा झाली. भारताच्या जी. दत्तू टी. टी. याने भारताच्याच सूर्याक्ष रावत याचा कडवा संघर्ष ११-१५, १५-६, १५-११ असा मोडून काढला. मात्र रौनक चौहान व लालथाझुआला हमर या दोन्ही खेळाडूंना पराभवाचा सामना करावा लागला. ली झी हांग याने रौनक चौहान याला १५-११, १५-१२ असे नमवले. रियान मालहान याने लालथाझुआला हमर याच्यावर १५-१३, १५-६ असा विजय साकारला आहे.

## रोनाल्डोचे विक्रमी ४१ गोल

**। लिस्बन । प्रतिनिधी ।**

पोर्तुगालचा ४० वर्षीय ख्रिस्तियानो रोनाल्डो व अर्जेंटिनाचा ३८ वर्षीय लियोनेल मेस्सी याने फुटबॉलच्या रणांगणात पुन्हा एकदा विक्रमी कामगिरी केली आहे. रोनाल्डो याने विश्वकरंडक पात्रता फेरीमध्ये सर्वाधिक ४१ गोल करण्याचा पराक्रम केला. लियोनेल मेस्सी याने अर्जेंटिना संघाचे प्रतिनिधित्व करीत असताना प्युयर्टो रिर्को संघाविरुद्ध दोन गोलांना सहाय्य करीत नवा विक्रम प्रस्थापित केला. आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्वाधिक सहाय्य गोल करणाऱ्या यादीत मेस्सी याने पहिल्या स्थानावर झेप घेतली. त्याने ग्वाटेमालाच्या कार्लोस रुईझ याच्या पात्रता फेरीतील ३९ गोलांना लीलया मागे टाकले. हंगेरीकडून अटीला एसझलाई व डोमिनिक झोबोसलाई यांनी गोल करीत बरोबरी साधली आहे.





विश्वकरंडक पात्रता फेरीमध्ये सर्वाधिक गोल करणाऱ्या फुटबॉलपटूंच्या यादीत ख्रिस्तियानो रोनाल्डो याने ४१ गोल करीत पहिला क्रमांक पटकावला. ग्वाटेमालाच्या कार्लोस रुईझ याने ३९ गोल केले. त्यामुळे तो आता दुसऱ्या स्थानावर आहे. अर्जेंटिनाचा दिग्गज खेळाडू मेस्सी ३६ गोलांसह तिसऱ्या स्थानावर आहे. नेमारला टाकले मागेअर्जेंटिना व प्युयर्टो रिको यांच्यामध्ये लढत पार पडली. मेस्सीने या लढतीत दोन गोलांना सहाय्य केले. याचसोबत त्याने ब्राझीलच्या नेमारच्या विक्रमालाही मागे टाकले. आंतरराष्ट्रीय फुटबॉलमध्ये सर्वाधिक सहाय्य गोल करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत लियोनेल मेस्सीने पहिल्या स्थानावर झेप घेतली. लियोनेल मेस्सी याने आतापर्यंत ६० गोलांना सहाय्य केले आहे. नेमारने ५९ गोलांना सहाय्य केले होते. अमेरिकेच्या लंडन डोनावन याने ५८ गोलांना, हंगेरीच्या फेरेंक पुसकान याने ५३ गोलांना आणि बेल्जियमच्या केव्हीन दी ब्रुएन याने ५३ गोलांना सहाय्य केले.

## रोहित बनणार सिक्सर किंग

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय संघाचा विस्फोटक सलामीवीर फलंदाज रोहित शर्मा आगामी ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर एक नवा विश्वविक्रम करण्याच्या उंबरठ्यावर उभा आहे. १९ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेत रोहितच्या नजरेसमोर पाकिस्तानचा माजी कर्णधार आणि आक्रमक फलंदाज शाहिद आफ्रिदीचा वनडे क्रिकेटमधील सर्वाधिक षटकारांचा विक्रम आहे.

वनडे क्रिकेटमध्ये 'सिक्सर किंग' म्हणून प्रसिद्ध असलेल्या रोहित शर्मा सध्या सर्वाधिक षटकार मारण्याच्या बाबतीत दुसऱ्या स्थानावर आहे. हा विक्रम मोडण्यासाठी त्याला ऑस्ट्रेलियाविरुद्ध होणाऱ्या तीन वनडे सामन्यांच्या मालिकेत फक्त ८ षटकारांची गरज आहे. तीन सामन्यात आठ षटकार ठोकताच तो जगातल सर्वात मोठा 'सिक्सर किंग' ठरणार आहे. यासह तो वनडे क्रिकेटमध्ये नवा विश्वविक्रम करण्याची शक्यता आहे.

आफ्रिदीच्या नावावर वनडेत ३५१ षटकार शाहिद आफ्रिदीने आपल्या ३९८ सामन्यांच्या वनडे कारकिर्दीत ३५१ षटकार मारले आहेत, हा विक्रम गेल्या अनेक वर्षांपासून कायम आहे. रोहित शर्माने आतापर्यंत २७३ सामन्यांच्या २६५ डावांमध्ये ३४४ षटकार मारले आहेत. रोहितने हा आकडा पार केला, तर तो केवळ आफ्रिदीला मागे टाकणार नाही तर सर्वात कमी डावांमध्ये ही कामगिरी करणारा फलंदाज देखील बनेल. भारतीय क्रिकेट चाहते आतुरतेने त्याच्या या विक्रमाची वाट पाहत आहेत. 'हिटमॅन' रोहित या दौऱ्यावर हे ऐतिहासिक शिखर गाठेल असा भारतीय चाहत्यांना विश्वास आहे. तसेच त्यासाठी त्याचे हा विश्वविक्रम पुर्ण होण्यासाठी प्रार्थना करत आहेत.

## अभिषेक प्लेअर ऑफ द मंथ

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताचा डावखुरा फलंदाज अभिषेक शर्मा याला सप्टेंबर महिन्याचा आयसीसी प्लेअर ऑफ द मंथ म्हणून निवडण्यात आले आहे. गेल्या महिन्यात, टी-२० आशिया कप दरम्यान, त्याने भारतासाठी फलंदाजीची सुरुवात केली आणि सातपैकी सहा सामन्यांमध्ये दमदार सुरुवात केली. ३१४ धावा केल्याबद्दल त्याला प्लेअर ऑफ द सिरीज पुरस्कारही मिळाला. तत्याने टी२० आशिया कपमध्ये डावाची सुरुवात केली आणि भारताला जलद आणि दमदार सुरुवात दिली. आशिया कपमध्ये ३१४ धावा काढल्याबद्दल अभिषेक शर्माला आयसीसी 'प्लेअर ऑफ द मंथ' म्हणून निवडण्यात आले.

## महिला खेळाडूंसाठी सरकारचे महत्वाचे पाऊल



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्यातील महिला खेळाडूंच्या सक्षमीकरणासाठी राज्य सरकारने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. राज्यातील सर्व क्रीडा संकुल, स्पोर्ट्स क्लब, जिमखाना, स्टेडियम तसेच स्थानिक क्रीडांगणांवर स्वतंत्र, स्वच्छ, सुरक्षित व सुसज्ज चेंजिंग रूमची सुविधा राज्य सरकार उपलब्ध करून देणार आहे. राज्यातील महिला खेळाडूंसाठी अत्यंत महत्त्वाचा आणि ऐतिहासिक निर्णय घेत असल्याची माहिती क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिली.

मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरने काही दिवसांपूर्वी दादर छत्रपती शिवाजी पार्क जिमखाना नूतनीकरणाच्या उद्घाटनप्रसंगी महिलांना क्रीडांगणावर सुरक्षित व आदरयुक्त वातावरण मिळालेच पाहिजे, त्यासाठी देशभरातील क्रीडा संकुलात महिलांना चेंजिंग रूमची सुविधा उपलब्ध करून दिली पाहिजे, असे आवाहन केले होते. या भावनिक आवाहनाने संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले होते.

चेंजिंग रूममध्ये स्वच्छतागृह, आरोग्य सुविधा आणि आवश्यक सुरक्षिततेसाठी मर्यादित क्षेत्रात सीसीटीव्हीद्वारे देखरेख ठेवली जाणार आहे. तसेच प्रत्येक ठिकाणी महिला सुरक्षा कर्मचारी नियुक्त करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जुन्या इमारती दुरुस्त करणे अथवा नवीन चेंजिंग रूम बांधण्यासाठी तत्काळ प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मंत्री कोकाटे यांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत.

### ३-२ ने उडवला धुव्वा | आशिया कप स्पर्धेत दुसऱ्यांदा पराभव

# भारताने पाकिस्तानला धूळ चारली

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताने पाकिस्तानला मिळेल तिथे ठेचायचा चंग बांधला आहे. मग ते युद्धाचे मैदान असो की खेळाचे भारत मिळेत तिथे पाकिस्तानच्या नांग्या ठेचत आहे. आशिया कप स्पर्धेत भारतीय संघाने दोनदा पाकिस्तानला पराभवाची धूळ चारली. इतकंच काय तर डोकंचवर काढू दिले नाही. त्यामुळे पराभवाची मालिका सुरु आहे. ही मालिका आता क्रिकेटच्या मैदानापुरता मर्यादीत राहिली नाही. भारतीय फुटबॉल संघाने पाकिस्तानला पराभवाची धूळ चारली. भारतीय क्रिकेट संघाने दुबईत २१ सप्टेंबरच्या रात्री १२ वाजता पाकिस्तानला पराभवाचे पाणी पाजले त्यानंतर १७ तासांनी भारताच्या युवा फुटबॉल संघाने



कमाल करत पाकिस्तानला पराभूत केलं. श्रीलंकेतील कोलंबोत साउथ एशियन फुटबॉल फेडरेशनच्या अंडर १७ चॅम्पियनशिप स्पर्धा सुरु आहे. आशिया कप प्रमाणेच एसएफएफ चॅम्पियनशिपमध्ये भारत आणि पाकिस्तान एकाच गटात होते. या स्पर्धेतील साखळी फेरीतील सामन्यात भारताने पाकिस्तानचा ३-२ ने धुव्वा उडवला. तसेच गटात पहिले स्थान कायम ठेवले आहे.

भारतीय संघाने पाकिस्तानचा ३-२ असा पराभव केला आणि तिन्ही सामने जिंकून गटात पहिले स्थान मिळवले. भारताने या सामन्यात आक्रमक खेळीचे दर्शन घडवलं. अर्धा तासापर्यंत दोन्ही संघ पहिल्या गोलसाठी धडपडत होते. त्यात भारताचा आक्रमक पवित्रा पाहून पाकिस्तान बॅकफूटवर गेले होते. ३१ व्या मिनिटाला. डल्लामुओ गंगटेने गोल करून त्यांना १-० अशी आघाडी मिळवून दिली. पाकिस्तानच्या मुहम्मद अब्दुल्लाहने ४३ व्या मिनिटाला पेनल्टीचं रुपांतर गोलमध्ये केलं आणि बरोबरी साधली. दुसऱ्या डावात भारताने पुन्हा आघाडी घेतली. ६३व्या मिनिटाला गुनलिबा वांगखेरकपमने गोल करून २-१ अशी आघाडी मिळवून दिली. ७० व्या मिनिटाला हमजा यासिरने दुसरा गोल केला आणि २-२ अशी बरोबरी साधली.

पाकिस्तानला दुसऱ्या गोलनंतर मिळाला दिलासा फार काळ टिकाला नाही. अवघ्या तीन मिनिटांनी भारताने सामन्यात तिसऱ्यांदा आघाडी घेतली.रेहान अहमदने ७३ व्या मिनिटाला गोल करून ३-२ अशी स्थिती आणली. त्यानंतर पाकिस्तानला संधीच दिली नाही. ९० मिनिटांपर्यंत पाकिस्तान गोलसाठी झुंजत राहिला पण यश मिळालं नाही.

### सहा वेळा विजेता

**भारतीय संघ आधीच उपांत्य फेरीत पोहोचला असून नेपाळशी सामना होणार आहे. तर पाकिस्तानचा सामना बांगालादेशशी होईल. भारताने ही स्पर्धा सर्वाधिक म्हणजे सहा वेळा जिंकली आहे.**

## टेस्ट पॉईंट्स टेबलमध्ये उलटफेर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

पाकिस्तानच्या विजयामुळे वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप स्पर्धेच्या पॉईंट्स टेबलमध्ये मोठा बदल झाला आहे. शान मसूदच्या नेतृत्वाखालील पाकिस्तान संघाने वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या स्पर्धेतील पहिलाच सामना जिंकला. या विजयासह ते पॉईंट्स टेबलमध्ये दुसऱ्या स्थानावर पोहोचले आहे. तर पाकिस्तानच्या विजयामुळे भारताला मोठा धक्का बसला असून चौथ्या स्थानावर घसरला आहे. भारताने सातपैकी चार कसोटी जिंकल्या आहेत, दोन गमावल्या आहेत आणि एक अनिर्णित राहिला आहे. भारताचे ५२ रेटिंग गुण आहेत. दरम्यान, पाकिस्तानचे १२ गुण आहेत. तर श्रीलंकेचे १६ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे. त्यामुळे भारताला पुढील कसोट्या मोठ्या फरकाने जिकाव्या लागणार आहेत.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)